**The Maharaja Sayajirao University of Baroda,**

**Vadodara**

Title

***Navvadottar Marathi Gramin***

***Kadambari: Ek Chikitsak Abhyas***

***(Nivadak Kadambaryanchya Sandarbhat)***

Thesis Submitted for the partial fulfilment for the award of Doctor of Philosophy (Ph.D.)

in Marathi Language & Literature


Submitted by:

**Bapat Vinayak alias Vinay Laxman**

M.A., MH-SET, MSU-PET

Assistant Professor, Marathi Discipline - Goa University

Under the Guidance of

**Sanjaykumar Karandikar,** Ph.D.

Professor & Head

Dept. of Marathi Language & Literature Faculty of Arts

The Maharaja Sayajirao University of Baroda


**March 2024**

Department of Marathi Language & Literature
Faculty of Arts
The Maharaja Sayajirao University of Baroda
Vadodara- 390002 (Gujarat) India
Phone: 0265-2795340 Extn. 226. (M) 9909916978, 8320302217
mail:head-marathi@msubaroda.ac.in

Accredited Grade 'A+' by NAAC

## CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled *"Navvadottar Marathi Gramin Kadambari: Ek Chikitsak Abhyas (Nivadak kadambaryanchya Sandarbhat)"*, submitted by **Mr. Bapat Vinayak Alias Vinay Laxman** for the award of the degree of Doctor of Philosophy in the Department of Marathi Language & Literature, Faculty of Arts, The Maharaja Sayajirao University of Baroda, Vadodara, Gujarat has been carried out by him under my supervision.

The matter presented in this thesis incorporates the findings of independent research work carried out by the researcher himself. The matter contained in this thesis has not been submitted elsewhere for the award of any other degree.

**Prof. Sanjaykumar Karandikar**
Research Guide & Head
Department of Marathi Language & Literature
Faculty of Arts
The Maharaja Sayajirao University of Baroda
Vadodara. 390002. Gujarat

Date:

Deptt. of Marathi, The M. S. University of Baroda

# प्रतिज्ञापत्र

मी **बापट विनायक** उर्फ **विनय लक्ष्मण** प्रतिज्ञापूर्वक असे नमूद करतो की, महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा, वडोदरा-गुजरात, फैकल्टी ऑफ आर्टस् च्या **मराठी विभागांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरिता** सादर केलेला **'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी: एक चिकित्सक अभ्यास (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात)** हा शोधप्रबंध मी स्वतः **प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर** यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. आवश्यक तेथे पूर्वसूरींच्या मतांची ऋणनिर्देशपूर्वक नोंद केली आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध मी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीकरिता सादर केलेला नाही.

अभ्यासक

दिनांक: **बापट विनायक** उर्फ **विनय लक्ष्मण**

# मनोगत

माझा जन्म गोव्यातील धावे नामक एका खेड्यातील. घर गावापासून देखील दूर. गावात यायचे तरी दीड-दोन किलोमीटर चालावे लागते. परिसर मांत्र निसर्गसंपन्न! आजूबाजूला पसरलेल्या सुपारीच्या बागा.... नारळाची आणि केळीची झाडे... आणि खालच्या बाजूला असलेली वांयगणी शेती.... या अशा वातावरणांत माझा जन्म झाला आणि बरेच आयुष्य याच भागात व्यतीत झाल्याने ग्रामिणता मी जन्मापासून आनुभवत आलो आहे. मी ग्रामीण भागातील संपन्न निसर्गाचा अनुभव घेतला तसाच गरीबीचा आणि लोकांच्या जगण्यासाठीच्या संघर्षाचा देखील अनुभव घेतला. माझ्या लहानपणी आमच्या कुळागरात आणि शेतात काम करायला येणारे सर्व कामगार काष्टी घालून येणारे म्हणजे फक्त लंगोटी लावून येणारे होते. आमची परिस्थिती चांगली होती म्हणजे आम्हाला जेवणखाण व्यवस्थित मिळत होते. याचे कारण, शेती- कुळागरावर निस्सीम प्रेम करणारे माझे बाबा शिक्षक देखील होते आणि शिक्षणांत अत्यंत हुशार असलेली परंतु परिस्थितीमुळे सातवीच्या पुढे शिकू न शकलेली माझी आई अत्यंत कल्पकतेने संसाराचा गाडा चालवत होती.

अशा ग्रामीण वातावरणांत लहानाचा मोठा झाल्याने जेव्हा ग्रामीण साहित्याशी माझा परिचय झाला तेव्हा मला हे साहित्य आपले वाटू लागले. माझे जगणे देखील या साहित्यातून प्रतिबिंबित होत आहे असे वाटू लागले आणि ग्रामीण साहित्याबद्दलची आपुलकी वाढली व याच विषयात संशोधन करावे असे वाटू लागले व यातूनच माझ्या संशोधनाच्या विषयाचे बीजारोपण झाले आणि मी 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी: एक चिकित्सक अभ्यास' (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) या विषयावर संशोधन कार्य करण्याचे निश्चित केले आणि तीन वर्षांच्या खडतर मेहनतीनंतर ते आज पूर्णत्वास जात आहे याचा मला खूप आनंद आहे.

संशोधन करीत असताना सर्वात महत्त्वाचा कोण असतो तर तुमचा मार्गदर्शक, प्रा.डॉ. संजयकुमार करंदीकर यांच्या रुपाने मला देवमाणूस भेटला. मला ज्या ज्या वेळी अडचणी निर्माण झाल्या त्या त्या वेळी सर तत्परतेने माझ्या मदतीला धावून आले. सरांचे मार्गदर्शन आणि कणखर पाठबळ नसते तर एवढ्या कमी वेळात माझे हे संशोधन कार्य पूर्ण होऊच शकले नसते. मी पीएचडी संशोधन बरोडा विद्यापीठातून करीत असलो तरी मी गोवा विद्यापीठात कार्यरत आहे. त्यामुळे या विद्यापीठाने मला जे सहकार्य दिले त्यामुळे माझे संशोधन कार्य सुकर झाले. विशेषतः माझ्या संशोधन कार्यासाठी मला सहा महिन्यांची अभ्यास रजा मंजूर करून दिल्याबद्दल गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. हरिलाल बी मेनन, कुलसचिव प्रा. डॉ. व्ही.एस्. नाडकर्णी आमच्या भाषा विभागाच्या अधिष्ठात्या

डॉ. अनुराधा वागळे यांचे मी आभार मानावेत तेवढे थोडेच. माझ्या या संशोधन कार्यात माझ्या सहकारी प्राध्यापकांनी दिलेले सहकार्य तेवढेच महत्त्वाचे, यात सर्वात प्रथम उल्लेख केला पाहिजे तो डॉ. विनय मडगांवकर यांचा हा माणूस माझ्या मदतीला कायम तत्पर राहिला आहे. त्याचप्रमाणे प्रा. चिन्मय घैसास, प्रा. पूर्वा वस्त, डॉ. हेमंत अय्या व प्रा. जयेश गांवकर यांचे देखील त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार. कोंकणी विभागातील डॉ. प्रकाश पर्येकर व माझ्या संशोधन कार्यातील माझ्या प्रगतीबद्दल कायम विचारणा करणारे समाजशास्त्र विभागातील डॉ. अरविंद हळदणकर यांचे ही आभार. मराठीतील एक कवी, समीक्षक आणि प्राचर्य पदाची धुरा सांभाळणारे डॉ. गोविंद काजरेकर यांचे विशेष आभार त्यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य अमूल्य स्वरूपाचे आहे. या ठिकाणी आणखी एक उल्लेख मुद्दामहून केला पाहिजे तो म्हणजे डॉ. अरूणा ढेरे यांचा मला कुठेही उपलब्ध होत नसलेली पुस्तके त्यांनी मला उपलब्ध करून दिली. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच मला आवडेल.

घरच्यांची साथ नसेल तर कोणतेच कार्य यशस्वी होऊ शकत नाही. मी आज जो काही आहे तो माझ्या आईमुळे आज वयाची पंचात्तरी ओलांडली तरी कुळागरात रमणाऱ्या माझ्या आईमुळेच मी आज या ठिकाणी पोहचू शकलो तिचा प्रेमळ सहवास मला असच मिळत रहावा ही ईश्वरचरणी प्रार्थना. बाबा लहानपणीच सोडून गेले परंतु ते जिथे असतील तिथून मला आशीर्वाद देत असतील हा विश्वास मला आहे. माझी भावंडे छायाताई, वैभव, प्रज्ञा व सिद्धेश हे माझ्या जगण्यातील अविभाज्य भाग होत, मी माझे संशोधन कार्य पूर्ण करतोय याचा माझ्यापेक्षा त्यांना होणारा आनंद अधिक आहे. पत्नीला अर्धांगी म्हणतात पण सौ. विनया ही माझी सर्वांगी आहे. माझी सगळी काळजी ती घेते म्हणूनच मी हे संशोधन कार्य करू शकलो तसेच माझे दोन्ही मुलगे चि. अथर्व आणि चि. अर्णव हे माझे आधारस्तंभ आहेत.त्यांच्या प्रेमळ सहवासामुळे मी हे संशोधन कार्य आनंदी वातावरणात पूर्णत्वास नेऊ शकलो. माझे सासरे श्री. व्ही.एन्. भिडे व सासू सौ. विद्या भिडे यांचाही मला या ठिकाणी कृतन्यतापूर्वक उल्लेख केलाच पाहिजे. माझा मित्र परिवार तर खूपच मोठा आहे व त्या सर्वांचे पाठबळ मला सतत मिळत असल्याने मी हे कार्य पूर्ण करू शकलो.मला संशोधन कार्यासाठी सतत प्रोत्साहित करणारी माझी धेंपे महाविद्यालयातील सहकारी प्रा. अंजू साखरदांडे, डॉ.वैशाली नाईक डॉ. रोशिदा रॉड्रगीस, प्रा. क्लेरिंडा डायस, प्रा. पांडुरंग नाईक व 'तुझे संशोधन कार्य तीन वर्षात पूर्ण झालेच पाहिजे' अशी प्रेमळ धमकी देणाऱ्या मित्रवर्य डॉ. मनोज इब्रामपूरकर यांचे विशेष आभार! आणि माझे असंख्य आजी-माजी विद्यार्थी.... सरांच्या पीएचडी ची माझ्यापेक्षा त्यांना काळजी जास्त! या विद्यार्थ्यांचा माझ्या प्रतिचा स्नेह असाच कायम राहो हे ईश्वराकडे मागणे.

या सर्वांच्या पाठिंब्यामुळे, सहकार्यामुळे आणि असंख्य शुभेच्छांमुळे मी हे संशोधनाचे कार्य पूर्णत्वास नेत आहे. भविष्यात देखील असे संशोधन कार्य करीत राहण्याची प्रेरणा तो सर्वेश्वर मला देत राहो ही त्याच्याच चरणी प्रार्थना.

दि:

**विनायक** उर्फ **विनय लक्ष्मण बापट**

# नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी:एक चिकित्सक अभ्यास

## (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात)

अनुक्रमणिका


| प्रकरण | पृ. क्र. |
|---|---|
| **प्रकरण-1**<br>कादंबरी स्वरूप व चिकित्सा आणि नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी | 1 |
| **प्रकरण-2**<br>वाङ्‌मयाची कालिक संकल्पना आणि ग्रामीण मराठी कादंबरीच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता. | 50 |
| **प्रकरण -3**<br>अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास: | 83 |
| **प्रकरण-4**<br>अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास | 251 |
| **प्रकरण- 5**<br>उपसंहार व निष्कर्ष | 365 |
| संदर्भ सूची | 382 |
| आधारग्रंथ सूची | 385 |
| परिशिष्ट | 386 |

# प्रकरण-1

# कादंबरी स्वरूप व चिकित्सा आणि मराठी ग्रामीण कादंबरी

## समारोप

मानवी जीवनातील ज्ञान प्रक्रिया ही भाषेमुळेच अव्याहतपणे चालू असते व त्यातूनच साहित्याची निर्मिती ही होत असते. मानवी जीवनातील विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून साहित्याकडे पाहता येते. साहित्याच्या अभ्यासात साहित्यिक विशेषांच्या अभ्याससोबतच सांस्कृतिक विशेषांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो. संस्कृतीचे वहन करण्याचे काम भाषा करीत असते व साहित्याच्या निर्मितीत संस्कृतीचे योगदान खूप मोठे असते. साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला आहे परंतु एकच एक परिपूर्ण अशी साहित्याची व्याख्या आज पर्यंत कोणालाही करता आलेली नाही. साहित्यांचे विविध विशेष लक्षात घेऊन या व्याख्या करण्यात आल्या आहेत. कथात्मक, नाट्यात्मक, व भावकाव्यात्मक, हे तीन साहित्याचे मूलबंध म्हणून सांगितले जातात. कादंबरी हा साहित्य प्रकार यातील कथात्म मूलबंधाशी संबंधित आहे. साधारणतः अठरावे शतक हा कादंबरीचा उदयाचा काळ म्हणून सांगितला जातो. हा साहित्य प्रकार पाश्चात्त्य परंपरेत विकसित झाला आणि नंतर तो मराठीत स्थिरावला. अर्थात भारतीय साहित्य परंपरेतही त्याची मुळे शोधता येतात. विशेषता महाकाव्यात किंवा आपल्याकडे बखर वांङ्मयाची किंवा लोकसाहित्याची जी संमृद्ध परंपरा अस्तित्वात आहे त्याच्यातही या वाङ्मयप्रकाराची मूळे शोधता येतील. अर्थात, आजच्या मराठी कादंबरीचा विचार करता ती पाश्चात्त्य परंपरेतूनच विकसित झाली आहे असे दिसते. विविध व्यामिश्र जाणिवांना समग्रपणे आपल्या कक्षेत सामावून घेणारा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहता येते. मराठीत सर्वच प्रकारच्या दीर्घकथनात्मक लेखनाला कादंबरी म्हटले जाते. इंग्रजी प्रमाणे 'नॉव्हेल्स'' आणि 'रोमान्स' अशा वेगवेगळ्या संज्ञा मराठीत अस्तित्वात नाहीत, त्यामुळे मराठी कादंबरीचा अभ्यास काहिसा किचकट होतो. जीवनाच्या सर्वचं अंगाना स्पर्श करण्याचे सामर्थ्य आधुनिक काळात फक्त कादंबरी या साहित्य प्रकारात कडेच आहे असे निश्चितपणे म्हणता येते. कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला आहे. कादंबरी लेखनाच्या विविध वैशिष्ट्यांचा समावेश या व्याख्यां मधून दिसून येतो परंतु कादंबरी हा साहित्य प्रकार एवढा लवचिक आहे की त्याची एकच एक व्याख्या करणे कठीण आहे. कादंबरीच्या विविध व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर कादंबरीचे एकूण स्वरूप कसे आहे ते आपल्या लक्षात येते. कादंबरीचा आवाका, व्यापकता लक्षात घेण्यासाठी अनेक अभ्यासकांनी केलेल्या या कादंबरीच्या विविध व्याख्या

लक्षात घ्याव्या लागतात. कादंबरीचे जे विविध विशेष दिसून येतात त्यावरून कादंबरीचे काही उपप्रकार मानण्यात येतात, अर्थात यातील बरेच उपप्रकार हे अभ्यासाच्या सोयिसाठी किंवा त्या प्रकारच्या कादंबऱ्यांमधून त्यास्वरूपाचे जे विविध विशेष लक्षात येतात ते ठळकपणे नमूद करण्यासाठी हे प्रकार मानण्यात येतात. या सर्व प्रकारातील एक अत्यंत महत्वाचा उपप्रकार म्हणून आपणाला 'ग्रामीण कादंबरी'कडे पहावे लागते.

ग्रामीण कादंबरीचा विचार करता ग्रामीण कादंबरी हे मराठी कादंबरी वांङ्मयाला लाभलेले सर्वात मोठे देशी परिमाण आहे असे म्हणता येते. ग्रामीण कादंबरीचा विचार करताना ज्याला खऱ्या अर्थाने ग्रामीण जाणिवांची कादंबरी म्हणता येईल अशी कादंबरी ही 1960 नंतर लिहिली जाऊ लागली हे आज सर्वच अभ्यासकांनी मान्य केले आहे. साठ नंतरच्या काळात ग्रामीण परिसरातून आलेला लेखक स्वतः घेतलेल्या अनुभवांना आणि तो ज्या परिसरात जगला, लहानाचा मोठा झाला त्या परिसराला तेथील भाषिक वैशिष्ट्यांसकट कादंबरीतून जिवंत करताना दिसतो. ग्रामीण कादंबरीच्या लेखनात त्या ठिकाणचा निसर्ग, त्या ठिकाणची भौगोलिकता आणि त्या ठिकाणची प्रदेश वैशिष्ट्ये या सर्वांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ग्रामीण परिसरातील लोकसंस्कृती आणि त्या ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या विविध बोली यांचा लेखनात केलेला वापर हे देखील ग्रामीण कादंबरीचे मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. ग्रामीण कादंबरीतून भूक, दारिद्र्य, अज्ञान, शोषण आणि उपेक्षा यांचे विशेषत्वाने दर्शन घडते. ग्रामीण कादंबरी लेखनाला असलेला ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचा असतो. ग्रामीणता हे विशेषण नसून ते एक आशयिक मूल्य आहे. ग्रामीणतेचे सर्जनशील भान व्यक्त होणे हे ग्रामीण कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. महात्मा जोतिबा फुले यांच्याकडे ग्रामीण साहित्याचे उद्गाते म्हणून पाहता येते त्यांनी शेतकऱ्यांची वेदना साहित्यातून सर्वप्रथम मुखर केली. महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्य विषयीचे विचार आणि 'खेड्याकडे चला' हा त्यांनी दिलेला नारा ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य, शाहू महाराजांचे समाजसुधारणेचे कार्य, या सर्व गोष्टी ग्रामीण कादंबरीला प्रेरणा देणाऱ्या ठरल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये ज्या विविध परिवर्तनवादी चळवळी निर्माण झाल्या त्यादेखील ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीला प्रेरक ठरल्या. हे सर्व लक्षात घेऊन ग्रामीणता हा लेखकाच्या जगण्याचा भाग व्हावा लागतो तेव्हाच त्याच्या साहित्यातून ग्रामीण संवेदना समर्थपणे व्यक्त होतात असे म्हणता येते. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मराठी कादंबरी दुबळी आहे असे डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्यासारख्या मान्यवर अभ्यासकांनी म्हटले आहे. मराठी ग्रामीण कादंबरी ही त्याला अपवाद नाही हे खेदाने नमूद करावे लागते. ग्रामीण कादंबरीचे स्वतंत्र तत्त्वज्ञान उभारणे शक्य आहे हे ही या अभ्यासातून अधोरेखित झाले आहे. ग्रामीण साहित्याची चळवळ 1977 नंतर मराठी साहित्यविश्वात उदयाला आली. या चळवळीने एकूण ग्रामीण

साहित्याला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. चळवळीने ग्रामीण कादंबरीला तिची तात्त्विक बैठक देण्याचा प्रयत्न केला. परिवर्तनवादी, शोषण विरोधी, सुधारणावादी, विकसनशील असे सगळेच विचार या चळवळीने स्वीकार्ह्य मानले. व म. फुल्यांना आपले मार्गदर्शक ही मानले. म.फुल्यांचा वैचारिक वारसा या चळवळीने स्वीकारला असला तरी प्रत्यक्षात ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीच्या पातळीवर जावून निरीक्षण केले असता महात्मा जोतिबा फुले यांची चिकित्सक, बहुसंस्कृतिवादी भूमिका चळवळीनंतरच्या लेखकांनाही पेलता आली नाही हे लक्षात येते. त्यामुळे चिकित्सा करणारे आणि धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणासंबंधात पूर्णतः नव्याने मांडणी करणारी कोणतीही कादंबरी लिहिली गेल्याचे दिसत नाही.जी मांडणी मा. फुल्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाला अभिप्रेत आहे. उलट डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तुत केलेले देशीवादाचे प्रारूपाने नव्याने लेखन करू लागलेल्या लेखकांना जास्त भुरळ घालणारे ठरले आहे. आजची मराठी कादंबरी देशीवादाच्या अंगाने पुढे जाताना दिसत आहे. या प्रारूपामुळे ग्रामीण भागातील लेखक लिहिता झाला आहे हे निश्चित! पण त्यामुळे विशिष्ट तात्त्विक बैठक ग्रामीण कादंबरीला प्राप्त होत आहे असे दिसत नाही. एकूण विचार करता, ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण परिसरातील लेखकाला लेखनास प्रवृत्त केले, त्याला आत्मभान दिले व त्याच्यातील न्यूनगंड दूर केला असे म्हणता येते. ही चळवळ नेमकी तात्त्विक भूमिका देण्यास मात्र अपयशी ठरली. साहित्यातून साहित्य म्हणून किंवा लेखकाची लेखक म्हणून कोणतीच तात्त्विक भूमिका व्यक्त होत नसेल तर त्या साहित्याला सखोलता व खोली प्राप्त होत नाही. अशा कादंबऱ्यांतून परिपूर्ण जीवनजाणिवा व्यक्त होऊ शकत नाहीत. मराठीत श्रेष्ठ दर्जाची म्हणावी अशी कादंबरी लिहिली गेली नाही असे जे अनेक अभ्यासक म्हणतात त्याचे कारण तात्त्विक बैठक नसणे हेच आहे व डॉ. हरिश्चंद्र थोरातांसारख्या अभ्यासकांनी हे पुन्हा पुन्हा सांगितले आहे. मराठी ग्रामीण कादंबरीला वेगळ्या उंचीवर जायचे असेल तर तिला निश्चित तात्त्विक भूमिका स्वीकारणे अपरिहार्य आहे. ही भूमिका स्वीकारायची असेल तर तिला देशी वादाचा स्वीकार सोईप्रमाणे नव्हे तर डोळसपणे करावा लागेल. आपल्या निर्मितीच्या शक्यताना लोकसंस्कृती आणि लोकसाहिच्याची जोड द्यावी लागेल. या परंपरांमधूनच लोकजाणिवा समर्थपणे व्यक्त करणे शक्य होणार आहे. म.फुल्यांची चिकित्सक बहुसंस्कृतिवादी भूमिकेचा स्वीकार करणे आता ग्रामीण लेखकाला अपरिहार्य आहे. म. फुल्यांची भूमिका ही परिवर्तनवादी तत्त्वज्ञाची आणि चिकित्सेची आहे. व्यापक स्वरूपाची चिकित्सा केल्याशिवाय आता आपणाला पुढे जाता येणे शक्य नाही. हे पुढे जाणे परंपरेचा धागा पकडूनच पण चिकित्सक भूमिकेचा स्वीकार करून जावे लागेल.पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता याचा समन्वय घडवून त्यातून आपली वैचारिक बैठक पक्की करून लेखकाला आता पुढे जाणे भाग आहे. ही वाट अत्यंत बिकट आणि लेखकाची लेखक

म्हणून परीक्षा घेणारी आहे. लेखकाला जीवनविषय विशिष्ट तत्त्वज्ञान मांडायचे असेल तर त्याला हे आव्हान स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. हे आव्हान स्वीकारून जेव्हा ग्रामीण कादंबरीचे लेखन केले जाईल तेव्हा श्रेष्ठतम दर्जाची कादंबरी निश्चित लिहिली जाईल.

# प्रकरण-2

# वाङ्मयाची कालिक संकल्पना आणि ग्रामीण मराठी कादंबरीच्या कालिक अभ्यासाची आवश्यकता

विशिष्ट  कालखंड आणि त्या कारखंडात निर्माण होणारे साहित्य याचा एक विशिष्ट सहसंबंध असतो. विशिष्ट कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण झालेले साहित्य याचा अभ्यास करताना या दोहोंचा परस्पर संबंध तपासणे आवश्यक असते. या अभ्यासातून बदलणाऱ्या काळाचा तत्कालीन साहित्यावर काय प्रभाव पडतो किंवा साहित्याचा एखाद्या कालखंडावर काय परिणाम होतो याचा आपणाला अभ्यास करता येतो. अभ्यासासाठीचा विषय, 'नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास: निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात' असा असल्याने या ठिकाणी काळाचा कादंबरी लेखनावर काय परिणाम झाला याचाच फक्त आढावा घेतला आहे. असा अभ्यास केल्याने एखाद्या काळात ज्या प्रकारचे साहित्य निर्माण होते त्याची पार्श्वभूमी काय होती याची जाणीव देखील आपणाला होते. कालखंड कसे मानावेत याबद्दल मतभेद असले तरी वाङ्मयाच्या संदर्भात विचार करता ज्या ठिकाणी वाङ्मयामध्ये ठळक अशी परिवर्तने जाणवतात त्या ठिकाणापासून काळ मानणे जास्त सयुक्तिक असते. प्रत्येक वाङ्मय प्रकाराचा कालखंडात वेगवेगळा असू शकतो कारण प्रत्येक वाङ्मयप्रकाराचे स्वरूप वेगवेगळे असते. ग्रामीण मराठी कादंबरीच्या संदर्भात विचार करताना 'नव्वदोत्तर'  हा वेगळा कालखंड निश्चितच मानावा लागतो. या काळात मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप पूर्णपणे बदलल्याचे दिसते. 1990 नंतर भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या प्रक्रियेने देखील जोर पकडला या सर्वामुळे शहरे तर बदलीच पण ग्रामव्यवस्थेवर देखील त्याचे गंभीर परिणाम झाले. कृषिकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाने मूलगामी स्वरूपाचे परिणाम केले आहेत. पारंपरिक शेती जवळ जवळ उद्ध्वस्तच झाली. पैशाला अतोनात महत्त्व प्राप्त झाले त्यामुळे शेतकऱ्यांची मानसिकता ही बदललेली या बदललेल्या मानसिकतेचे दर्शनही आपणाला या काळातील साहित्यातून घडते. कालिक दृष्टिकोनातून ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना काही गोष्टी लक्षात येतात. प्रारंभीच्या काळात ग्रामीण कादंबऱ्यांची संख्या नगण्य म्हणावी अशी होती. 1857 ते 1920 या साठ वर्षांच्या कालखंडात फक्त दोन ग्रामीण कादंबऱ्यांचे लेखन झाले. या काळात पडलेले तीन भीषण दुष्काळ, ग्रामीण भागांत शिक्षकाचा अभाव, लेखनाची कोणतीही परंपरा नसणे, शहरी माणसाचा गावाकडे पाहण्याचा तुच्छतापूर्वक

दृष्टिकोन, अशी अनेक कारणे या मागे आहेत. म. फुल्यांनी शेतकऱ्यांचे दुःख मांडले, त्यांनी त्यांना संघर्ष करण्यास सांगितले, त्यांनी धर्माची चिकित्सा करून बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला, सत्यशोधक समाज स्थापन करून नवपरंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु असे असुनही फुल्यांचे चिकित्सक, परिवर्तनवादी विचार पारंपरिक ग्रामसंस्कृतीचा प्रचंड प्रभाव असलेल्या शेतकऱ्यांना स्वीकारणे तसे कठीण गेले व तसेच हे विचार अधिक ताकदीने पुढे नेणारा म. फुल्यांच्या तोडीचा नेता नंतरच्या काळात निर्माण झाला नाही हे देखील प्रारंभीच्या काळात ग्रामीण कादंबरी अत्यल्प लिहिण्यामागचे एक कारण आहे . एकूणच शेतकरी, कष्टकरी समाज स्वतःची पिळवणूक, शोषण, स्वतःचे हक्क याबद्दल जागृत नसल्याने व अज्ञान, अंधश्रद्धा, याच्यांत गुरफटलेला असल्याने मोठ्याप्रमाणात दैववादी असल्याने साहित्य निर्मिती करणे, त्यातून आपली परिस्थिती मांडणे, आपले दुःख जगासमोर मांडणे, या सर्वांबद्दल उदासीन असल्याने दिसते. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून या काळात ग्रामीण कादंबरी अत्यल्प प्रमाणात लिहिली गेली. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा प्रभाव 1920 नंतरच्या कलखंडावर दिसतो. ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीवरही तो दिसून येतो. महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या घोषणेतून अनेक मध्यमवर्गीय, शहरी लेखकांचे लक्ष ग्रामीण भागाकडे वळले. ग्रामसुधाराच्या प्रामाणिक भावनेतून त्यांनी साहित्य निर्मिती केली परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थितीची काहीच कल्पना नसल्याने, त्यांच्या निर्मितीमागे भाबडा आशावाद, आदर्शवाद जास्त होता त्यामुळे ग्रामीण वास्तवापासून या कादंबऱ्या शेकडो मैल दूर होत्या. या सर्वच कादंबऱ्यातून झालेले ग्रामदर्शन हे स्वप्नाळू, कृतक आणि फक्त मनोरंजन स्वरूपाचेच होते. मार्क्सवादाने मात्र ग्रामीण शेतकरी, कष्टकरी, महिला यांच्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन दिला. मार्क्सवादी विचारांमुळे ग्रामीण साहित्य लेखनातही काही सकारात्मक परिवर्तने आली परंतु या विचारातून ग्रामीण मराठी साहित्य लेखनाची मोठी परंपरा मात्र निर्माण झाली असे दिसून येत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामविकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या. पचांयत राज्य संकल्पना अमलात आणली गेली. पंचायतीना जादा अधिकार देण्यात आले. पंचवार्षिक योजना सुरू करण्यात आल्या. कसेल त्याची जमीन, कुळ कायदा यांच्या माध्यमातून भू-सुधाराचे अनेक कायदे अस्तित्वात आले. अनेक नवीन जलसिंचन प्रकल्प सुरू झाले. सहकार तत्त्वावर अनेक संस्था, कारखाने सुरू झाले या सर्व बदलांचे जे काही बरेवाईट परिणाम झाले त्याचे चित्र आपणाला या काळात जे वाङ्मय निर्माण झाले त्यातून स्पष्टपणे पडल्याचे दिसते. शिक्षणाचा झालेला प्रसार, ग्रामीण माणसाचे जागृत झालेले आत्मभान, दलितांच्या चळवळी, या सर्वांच्या परिणामातून 1960 नंतर ग्रामीण साहित्याची निर्मिती मराठीत मोठ्याप्रमाणात होऊ लागली. मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करता. 1960 ते 1980 हा कालखंड मराठी ग्रामीण कादंबरीच्या विस्ताराचा आणि स्वरूप

निश्चितीचा कालखंड होता असे म्हणता येते. 1980 नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीत काही एक थिजलेपणा आल्याचे जाणवतो. 1977 नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली व या चळवळीने ग्रामीण साहित्य निर्मितीला नवीन पाठबळ प्रदान केले. वेगवेगळ्या समाज स्तरातून आलेले लेखक हळूहळू लिहू लागले व त्याचा दृश्य परिणाम आपणाला नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीच्या लेखनात दिसू लागला. १९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने क्रांतिकारी परिवर्तने घडविली. याच काळात झालेली संगणक क्रांती, फोन, मोबाईल यांचे ग्रामीण भागात झालेले आगमन या सर्वांनी संपूर्ण ग्रामीण जीवन बदलून गेले. नवीन आलेली हायब्रीड बियाणी, किटकनाशके, नगदी पिकांच्या मागे लागून शेतीचा बिघडलेला समतोल, पाण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, ओल्या आणि सुक्या दुष्काळाने शेतकऱ्यांचे मोडलेले कंबरडे, शेतीतील उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ न बसणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला भाव न मिळणे, यातून वाढलेला कर्जबाजारीपणा व यातूनच शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या. शेतकऱ्यांची सुशिक्षित पिढी तयार झाली पण त्यांना नोंकऱ्या नाहीत, आणि सर्वत्र पसरलेल्या भ्रष्टाचारामुळे नोकऱ्या विकत घेण्याची ऐपत नाही अशी कठीण परिस्थिती निर्माण झाली. शिकलेल्या मुलांना शेतीतील कामे कमी दर्जाची वाटणे, नोकरी मिळत नाही आणि शेती नको वाटणे यातून त्याला आलेले प्रचंड नैराश्य.अशा अनेक घटनांनी नव्वदोत्तर कालखंड गजबजून गेलेला दिसतो. या काळात जे साहित्य निर्माण झाले त्यावर देखील या सर्वाची छाया अगदी स्पष्टपणे जाणवते आणि म्हणूनच एखादा विविक्षित कालखंड आणि त्या कालखंडात निर्माण होणारे साहित्य यांचा अभ्यास करणे किती महत्त्वाचे असते हे देखील अधोरेखित होते.

प्रकरण -3

# अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास

## समारोप

नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरीचे स्वरूप समजावून घेण्यासाठी अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यांचा चिकित्सक आढावा घेतल्यानंतर, नव्वदोत्तर कादंबऱ्याचे स्वरूप आपल्यासमोर स्पष्ट झाले आहे. हा आढावा ग्रामीण कादंबरीच्या अनुषंगाने महत्त्वाचे असलेले काही घटक समोर ठेवून घेण्यात आला आहे. या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनचत्रण, व्यक्त झालेले कालभान आणि या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन हे ते तीन घटक या अभ्यासात महत्त्वाचे मानले होते. या तिन्ही घटकांची व्याप्ती मोठी असल्याने. कादंबरीच्या चिकित्सक अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक मुद्द्यांची चर्चा या तीन घटकांच्या अंतर्गत सहजतेने करता आली आहे. या चिकित्सक अभ्यासात या संबंधीचे विविध पैलू लक्षात घेऊन ती तशाप्रकारे करण्यात आली आहे.

जीवनचित्रण हा कोणत्याही कादंबरीच्या अभ्यासातील महत्त्वाचा घटक असतो. या अभ्यासातून त्या कादंबरीतून व्यक्त झालेला परिसर, त्या ठिकाणची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, माणसांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे स्वरूप या सर्वांचा अभ्यास करता येतो. ग्रामीण कादंबरीचा विचार करता हे जीवन कोणत्या घटकांनी बद्ध आहे. कोणते घटक या जीवनाला प्रभावीत करतात व या सर्वांच्या प्रभावातून त्या कादंबऱ्यांमधून आकाराला आलेले जीवनचित्रण आपल्या समोर येते व त्यावरून एकूण त्या काळातील ग्रामीण कादंबऱ्यांबद्दल काही एक विधान करणे या अभ्यासातून शक्य झाले आहे. नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरीतून व्यक्त झालेले हे जीवनचत्रण समजून घेण्यासाठी या कादंबऱ्यांचा अभ्यास या कादंबऱ्यांतील कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता, कादंभरीतून घडणारे ग्रामसंस्कृतीचे दर्शन व ग्रामीण परिसरात राहणाऱ्या माणसांना कोणत्या समस्यांचा दररोजच्या जगण्यात सामना करावा लागतो या संदर्भात या कादंबऱ्यांमधून व्यक्त होणाऱ्या समस्यांचे स्वरूप, व जीवन म्हटले की संघर्ष हा आहेच त्याचे स्वरूप, नव्वदोत्तर काळातील मराठी ग्रामीण कादंबरीतून घडणाऱ्या संघर्षाचे स्वरूप काय आहे? या सर्वांचा या घटकांच्या आधारे हा आढावा घेण्यात आला आहे. त्यानंतर कादंबरीतील काल या घटकाचे महत्त्व लक्षात घेऊन कालिक अभ्यासातून जे विविध घटक समोर येतात त्यांची सांगोपांग चर्चा झाल्यामुळे या अभ्यासातील कालिक संकल्पनेचे महत्त्व देखील अधोरेखित झाले आहे. त्याच बरोबर कादंबऱ्यांच्या चिकित्सक

अभ्यासामध्ये कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या चिंतनशीलतेचा समग्र आढावा घेणे अत्यावश्यक असते. तो आढावा देखील या ठिकाणी घेतला असून त्यातून नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी लेखनामागची भूमिका देखील स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. या सर्व अभ्यासातून जे हाती आले आहे ते निश्चितच विचार करायला लावणारे आहे.

कृषिकेंद्रीतता हे अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्यांचे व्यवच्छेदक लक्षण असून, कादंबऱ्यांचे स्वरूप ग्रामीण कादंबरी असे असल्याने ते तसे असणे स्वाभाविकच आहे. समस्याप्रधानता हा या जीवनदर्शनातील महत्त्वाचा घटक म्हणून सामोरा येतो. या समस्या ग्रामीण माणसाच्या आयुष्यात बहुतांशी निसर्गाच्या लहरीपणामुळे निर्माण होतात. आजही भारतीय कृषकसमाज सर्वस्वाने नीसर्गावर अवलंबून आहे. आधुनिक काळात शेतीत जे बदल झाले, त्या बदलांनी देखील ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांचे जीवन अधिक कष्टमय केल्याचे दिसते. 'चांगले पीकत नाही आणि पीकलेच तर विकत नाही.' ही शेतकऱ्यांची सर्वातमोठी समस्या आहे. भ्रष्टाचाराचा सामना आज सर्वानांच सर्व पातळ्यांवर करावा लागत आहे. शेतकरी या भ्रष्ट व्यवस्थेमुळे जास्त मेटाकुटीला येतो हे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून अधोरेखित होते. आजची शेती शेतकऱ्याला सुखाने जगू देत नाही आणि ही शेतीच त्याला आत्महत्येच्या दारात आणून उभा करते हे नव्वदोत्तर काळातील शेतीतील भयाण वास्तव या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून समोर येते. या पुढील काळात ग्रामीण माणसाचा विकास व्हायचा असेल तर तो फक्त शेतीवर अवलंबून राहून चालणार नाही. शेतीला पुरक असे इतर उद्योग किंवा नवीन स्वरूपाचे उद्योगधंदे गावागावात सुरू झाल्यास, शेतीवर आधारित असलेल्या मोठ्या समाजाची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारणे शक्य आहे. हे आर्थिक चिंतन यातील अनेक कादंबऱ्यांतून सूत्र पद्धतीने सांगितले आहे. नव्वदपूर्व कादंबऱ्यांशी नव्वदोत्तर काळातील कादंबरीची तुलना केली असता, नव्वदोत्तर काळात कृषिक्षेत्रातील समस्याप्रधानता वाढली असून. जागतिकीकरणाच्या प्रभावानंतर शेतकऱ्याचे जगणेच असाह्य झाल्याचे लक्षात येते. एककाळी उत्तम असलेली शेती आज कनिष्ठ झाली आहे व ती कोणालाही नको झाली आहे हे विदारक सत्य या अभ्यासातून समोर येते. आपल्या समस्या सोडविण्यासाठी आजही शेतकरी एकत्र येत नाही ही या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेली सर्वात मोठी खंत आहे. निसर्ग, बाजारपेठा आणि सरकारचे आयात निर्यात धोरण हे शेतकऱ्याला अधिकाधिक समस्यांच्या गर्तेत घेऊन जाताना दिसते. सरकारी अनास्था ही देखील शेतकऱ्यांच्या हलाखीच्या स्थितीला कारणीभूत आहे. सरकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाहीत आणि पोहचल्याच तरी त्या मिळवण्यासाठी शेतकऱ्याला जी धडपड करावी लागते व ज्या भ्रष्ट व्यवस्थेचा सामना करावा लागतो त्यामुळे त्याला सरकारी मदत नकोच असे वाटू लागते.

ग्रामीण माणसाच्या जीवनावर लोकसंस्कृतीचा पगडा अजूनही कायम असल्याचे दिसते. आधुनिकतेने ग्रामीण जीवनांत प्रवेश केला असला तरी अजूनही पारंपरिक लोकसंस्कृती ग्रामीण भागात टिकून असल्याचे दिसते. हे ग्रामीण भागातील लोकसंस्कृतीने बद्ध असलेले जीवन शहरी संस्कृतीपासून ग्रामसंस्थेचे असलेले वेगळेपण ठळकपणे अधोरेखित करताना दिसते. स्त्री बद्दलचा संकुचित दृष्टिकोन ग्रामीण भागात अजूनही तसाच आहे. 'मुलगा हवाच' या सारख्या समजांचा समाजावर खोलवर असलेला प्रभाव अजूनही ग्रामीण जीवनात कायम आहे. हुंड्यासारखी प्रथा आजही ग्रामीण परिसरात ठाण मांडून आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या ज्या ज्या कादंबऱ्यांमधून लग्न प्रसंगाचे वर्णन आले आहे त्या-त्या ठिकाणी हुंड्याचा प्रश्न समोर आला आहे. एका बाजूने महिला सशक्तिकरणाच्या गोष्टी चालू असताना दुसऱ्या बाजूने गावागावांतील हे वास्तव आपणाला विषण्ण करणारे आहे. पारंपरिक लोकसंस्कारातून घडणारे ग्रामीण मन जगण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले आधुनिक बदल स्वीकारत नाही परंतु आधुनिक विज्ञानाने लावलेले काही शोध आपले पारंपरिक बुरसटलेले दृष्टिकोन कायम ठेवण्यासाठी मात्र वापरते, हे या अभ्यासातून समोर येणारे धक्कादायक वास्तव आहे. आता ग्रामीण भागात देखील सर्वच क्षेत्रात राजकारणांने प्रवेश केला असून गावात गट-तट पडण्यात आणि गावची एकी नष्ट होण्यात या घाणेरड्या राजकारणाचा खूप मोठा हात असल्याचे दिसते.

आज ग्रामीण माणसाला प्रत्येक पातळीवर संघर्ष करावा लागतो हे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून दिसून येते. हा संघर्ष शेतीतील अडचणींमुळे असतोच त्याच बरोबर, व्यापारी आणि सरकार यांच्या विरूद्ध देखील असतो. व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक आणि सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि अनास्था या विरुद्ध शेतकऱ्याला करावा लागणारा संघर्ष त्याला जास्त हतबल करून टाकतो. शेतीची आर्थिक गणिते जुळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत तर अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकून मजूर होण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. शेतकऱ्यांचा संघर्ष दिवसेंदिवस वांझोटा ठरत असून चहुबाजूंनी लुबाडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यासमोर जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हे असेच चालू राहिल्यास, काही काळानंतर शेतकऱ्याचे अस्तित्वच संपून जाण्याची जी भयाण परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचे विदारक चित्र या सर्व अभ्यासातून समोर येताना दिसते.

कादंबरीच्या अभ्यासात काल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसते. एखाद्या विशिष्ट कालखंडातील साहित्याचा अभ्यास करीत असताना ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते. नव्वदोत्तर काळात जागतिक स्तरावर व ग्रामीण भागात देखील जी परिवर्तने झाली ती अभूतपूर्व म्हणावी अशीच आहेत. या सगळ्या परिवर्तनांना

जागतिकीकरणाचा खूप मोठा संदर्भ असल्याचे दिसते. शेतीचा विचार करता. हायब्रीड बियाण्यांची लागवड नव्वदोत्तर काळात मोठ्याप्रमाणात वाढली. या हायब्रीड बियाण्यांच्या लागवडी शिवाय दुसरा पर्याय देखील शेतकऱ्यांसमोर उरला नाही हे वास्तव देखील या अभ्यासातून समोर आले आहे. म्हणजे शेतकऱ्याला या परिस्थितीसमोर शरण गेल्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही. जास्त पैसे मिळवून देणारी म्हणून नगदी पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र मोठ्याप्रमाणात वाढले. नव्वदोत्तर काळात ही नगदी पिकेच शेतकऱ्यांसाठी 'काळ' ठरली आहेत. आजचा काळ हा शेतकऱ्यांसाठी सर्वात जास्त दुःखकारक असा काळ आहे हे या सर्व कादंबऱ्यांच्या अभ्यासातून व्यक्त झालेले समान सूत्र आहे. फक्त शेतकरीच नव्हे आधुनिक काळात गावातील विविध व्यवसाय करणारा कारागीर देखील देशोधडीला कसा लागला याचे भयाण वास्तव देखील यातील अनेक कादंबऱ्यांनी चित्रित केले आहे. बदलत्या काळात शेतकऱ्यांना या समस्यांच्या गर्तेतून बाहेर यायचे असेल तर शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे हा संदेश नव्वदपूर्व अनेक ग्रामीण कादंबऱ्यांतून व्यक्त झालेला दिसतो. नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून मात्र शिक्षणांने परिस्थिती सुधारेल हा भ्रम असल्याचे ठामपणे मांडले आहे. कारण आजच्या शिक्षणाकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे नाहीत आणि त्यांच्या मुलांना दुसरा रोजगार मिळवून देण्याची ताकद ही नाही. नव्वदोत्तर काळातील कादंबऱ्यांचा विचार केला असता, शिक्षणांने शेतकऱ्यांच्या मुलांना अधिक त्रासात टाकले असाच भाव व्यक्त होताना दिसतो. ज्याचा विचार आपल्या एकूण शैक्षणिक व्यवस्थेलाच करावा लागणार आहे. जे चांगले होते ते सर्व नष्ट होत आहे आणि नवीन विधायक स्वरूपाचे काहीच तयार होत नाही अशा एका भयाण कालखंडाचे दर्शन या कादंबऱ्यांमधून आपणाला घडते.

कादंबरीतून व्यक्त होणारी चिंतनशीलता हा कोणत्याही कादंबरी लेखनाचा महत्त्वाचा घटक असल्याचे दिसते. चिंतनशीला कादंबरीला तिची खरी ओळख देतो असे म्हणता येते. या सर्व कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेली चिंतनशीलता एकूण नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून जे विविध विषय हातळण्यात आले आहेत त्या बद्दलचे विविध दृष्टिकोन अगदी सुस्पष्टपणे या चिंतनशीलतेतून आपल्या समोर येतात. दलित-दलितेतर संघर्ष हा ग्रामीण परिसरातील एक महत्त्वाचा विषय असून 'तणकट' सारख्या कादंबरीतून हा विषय या संघर्षांचे अनेक पैलू लक्षात घेऊन हाताळण्यात आला आहे. या सर्व चिंतनशीलतेचे सार सांगायचे झाल्यास आताताईपणे व अविचारी पद्धतीने केलेला संघर्ष आपल्याच मूळावर येतो त्यामुळे पुढील काळात एकमेंकाना समजून घेत सामंजस्यांनेच दोन्ही समाजाना वाटचाल करावी लागेल हेच चिंतन लेखक मांडताना दिसतो. कालानुरूप जातीव्यवस्था नष्ट होण्या ऐवजी त्या अधिक टोकदार होत आहे हे वास्तव निश्चितच अस्वस्थ करणारे आहे. जागतिकीकरणाचे परिणाम आता ग्रामीण

भागात ठळकपणे दिसून येत असून या ठिकाणचा भूमिपुत्र त्याच्या पाळामुळांसकट या ठिकाणापासून उपटून टाकण्याचे प्रयत्न सुरू असून या विरुद्ध संघर्ष करण्यासाठी आवश्यक असणारी ताकद आपल्याकडे नाही हे देखील नव्वदोत्तर कादंबऱ्यांच्या चिंतनातून समोर आले आहे. एकत्र कुटुंब पद्धती आता जवळपास संपली आहे आणि ती संपली याला बदलते कालमान जबाबदार आहे. जी गोष्ट काळाच्या निकषावर टिकू शकत नाही ती टिकाव धरू शकत नाही. या भूमिकेतून नव्वदोत्तर लेखक ढासळणाऱ्या कुटुंब व्यवस्थेकडे पाहताना दिसतो. नव्वदपूर्व काळात या ढासळणाऱ्या कुटुंबव्यवस्थेबद्दलचा जो एक भाबडा भाव व्यक्त होत होता व हे टिकले पाहिजे ही भूमिका घेतली जात होती ती नव्वदोत्तर काळात पूर्ण बदली असून ही व्यवस्था टिकणे शक्य नसेल तर योग्यवेळी तोडणे उत्तम असा अत्यंत व्यवहारिक दृष्टिकोन नव्वदोत्तर काळातील कादंबऱ्यांतील चिंतनातून व्यक्त झाला आहे. हे बदललेले चिंतन निश्चितच महत्त्वाचे आहे. समाजातील नैतिक मूल्यांचा झालेला ऱ्हास हे आजच्या सामाजिक अधोगतीचे एक महत्त्वाचे कारण आहे. हे चिंतन देखील या नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसते. कृतिशुन्य राजकारणाची तत्त्वे कितीही चांगली असली तरी लोक असल्या राजकारणाला किंमत देत नाहीत, त्यापेक्षा विधिनिषेध न पाळणारे पण कृतीशील राजकारण लोकांना आवडते हे व्यक्त झालेले चिंतन निश्चितच सर्वांना विचार करायला लावणारे आहे. आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत तर अधिक जटिल होतात व पाठीमागून जे राहतात त्यांचे जीवन अधिक क्लेशदायक होते हा या कादंबऱ्यांमधून पुढे आलेला विचार देखील खूपच महत्त्वाचा आहे. आपले अर्थशास्त्र हे आपल्या गरजा कमीतकमी करून अंथरूण पाहून पाय पसरण्याचे होते परंतु आपण गरजा वाढविणारे आणि कर्ज काढून सण साजरे करणारे अर्थशास्त्र स्वीकारल्यामुळे आपली अधोगती झाली आहे. हा या अभ्यासातून पुढे आलेला विचार सर्वांनी लक्षात घेण्यासारखा आहे.

नव्वदोत्तर काळातील अनेक ग्रामीण लेखक एक निश्चित भूमिका घेऊन आपले कादंबरी लेखन करताना दिसतात. सुस्पष्ट असा त्यांचा दृष्टिकोन त्यातून दिसून येतो. लेखक जेव्हा विशिष्ट अशी नैतिक भूमिका घेऊन लेखन करतो तेव्हा ते अधिक चिंतनशील व विचार प्रवर्तक ठरते. अभ्यासासाठी निवडलेल्या सगळयाच कादंबऱ्यांतून नसले तरी काही कादंबऱ्यांतून अशी निश्चित नैतिक भूमिका घेऊन लेखन झाले असल्यामुळे या नव्वदोत्तर कादंबऱ्या मराठी ग्रामीण कादंबरीला पुढील टप्प्यावर घेऊन जाणाऱ्या आहेत असे निश्चित म्हणता येते.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून जे वेगवेगळया स्वरूपाचे चिंतन व्यक्त झाले आहे ते पाहिल्यानंतर नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीकार आपल्या लेखनाअडे आणि ग्रामीण परिसराकडे आत्यंतिक गांभिर्याने पाहतात व लोकांच्या व्यथा वेदनांना शब्द देतात. हे शब्द देत असतानाच पुढे काय? या संबंधीची चिंतन किंवा का झाले त्याची

कारण मिमांसा वा पुढे काय होईल त्याचे आराखडे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे वर्तमानाची मूलभूत चिकित्सा करताना दिसतात. हे जे चिंतन व्यक्त झाले आहे त्याचा आढावा घेतल्यास नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी निश्चितच ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत पुढच्या पायरीवर पोहचली आहे असे आपणाला म्हणता येते.

# प्रकरण-4

# अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास

## समारोप

कादंबरीतील आशयाचे अंग महत्त्वाचे असले तरी अभिव्यक्ती देखील तेवढीच महत्त्वाची असते. आपणाला आशयापर्यंत घेऊन जाण्याचे काम अभिव्यक्ती करते हे विसरून चालणार नाही. जेव्हा आपण यशस्वी साहित्यकृतींचा विचार करतो तेव्हा त्यात आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंचाही उत्तम समन्वय साधलेला असतो असे दिसून येते त्यामुळे कोणत्याही साहित्यकृतीचा विचार करीत असताना आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही अंगांनी करणे आवश्यक असते. साहित्याच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना साहित्यात निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य ही चार महत्त्वाची अंगे असतात. या चार अंगांच्या आधारे लेखन मनातील आशयाला अभिव्यक्त करीत असतो किंवा आशयाची मांडणी करीत असतो असे म्हणता येते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता या कादंबऱ्यांतून पारंपरिक निवेदनपद्धतीचाच वापर केल्याचे दिसते. बहुतांश कादंबऱ्यांमधून तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ‘गावठाण’ सारख्या कादंबरीतून प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ‘चाळेगत’ सारख्या कादंबरीतून निवेदनाच्या बाबतीत अनेक प्रयोग देखील केल्याचे दिसतात. हे निवेदनातील प्रयोग ग्रामीण कादंबरीतूनच नव्हे तर एकूणच मराठी कादंबरीत प्रथमच करण्यात आले आहेत. ‘बारोमास’ सारख्या कादंबरीत तृतीयपुरूषी वा काहीकडे प्रथमपुरूषी निवेदन देखील आले आहे तसेच ‘चाळेगत’ व ‘बारोमास’ या दोन्ही कादंबऱ्यांत काहीकडे रोजनिशी पद्धतीचा वापर देखील करण्यात आला आहे. कादंबरीची वाचनियता कायम राखण्यात नेमकी निवेदनशैली खूप महत्त्वाची असते. एक-दोन कादंबऱ्यांचा अपवाद वगळता कादंबरीच्या निवेदनपद्धतीत ग्रामीण कादंबरीकारांनी काही विशेष प्रयोग केलेले नाहीत पण ग्रामीण कादंबऱ्यांतून जी वास्तवता त्यांना मांडायची आहे त्याची परिणिमकारकता कायम राहील अशी निवेदनपद्धती त्यांनी निवडल्याचे दिसते.

कादंबरीचा भाषिक अभ्यास करीत असताना वर्णनात्मकता हा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून सांगता येतो. यामध्ये व्यक्तिरेखा, परिसर वा अवकाश यासंबंधीचे विश्लेषण येते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता, या सर्वच कादंबऱ्या ग्रामीण अवकाशात घडताना दिसतात. ग्रामीण परिसराचे वा अवकाशाचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी वर्णनात्मक पद्धतीने केले आहे ज्यातून तो परिसर त्याच्या बारीकसारीक तपशीलासह वर्णन केल्याचे

दिसते. काहीकडे संवाद वा निवेदनाच्या माध्यमातून देखील अवकाशाचे चित्रण कादंबरीतून होताना दिसते. या परिसर वर्णनातून वा अवकाशातून ग्रामीण परिसरातील कृषिजीवन जीवंतपणे उभे राहिले आहे. ‘चाळेगत’ सारख्या कादंबरीतून अवकाशाचा वापर अत्यंत सूचकतेने करण्यात आला आहे. नव्वदोत्तर कादंबरीतील अवकाश हा त्याच्या अगोदरच्या कादंबऱ्यांशी तुलना करता बराच बदलला आहे हे लक्षात येते. परिसर ग्रामीणच असला तरी त्या परिसराच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, जडणघडणीत नव्दोत्तर काळात मोठा फरक पडला असून त्याचा परिणाम लोकांच्या मानसिकतेवर व विचाक करण्याच्या पद्धतीवर झाला आहे. यामुळेच परिसर ग्रामीण असला तरी या कादंबऱ्यांचा अवकाश मात्र बदलला असे दिसून येते. पात्रांचा विचार करता अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील सर्वच पात्रे ग्रामीण पार्श्वभूमीवर आकाराला येताना दिसतात त्यामुळे ग्रामीण जीवनांतील सर्व वैशिष्ट्ये घेऊन ही पात्रे अवतरतात. या पात्रांचे वर्गीकारण करण्याचा प्रयत्न केल्यास केंद्रवर्ती असलेली पुरूष पात्रे, दुय्यम पात्रे, स्त्री व्यक्तिरेखा, खलस्वरूपाची पात्रे, अशाप्रकारचे वर्गीकारण करता येते. अनेकवेळा अनेक अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून निसर्ग हाच सर्वात मोठे खलपात्र म्हणून समोर येताना दिसतो. बहुतेक कादंबऱ्यांतून येणाऱ्या केंद्रवर्ती व्यक्तिरेखा या पुरूष असून त्या व्यक्तिरेखा कृषीव्यवस्थेत पिचून गेल्याचे दिसतात. ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, ‘साखरफेरा’, ‘कापूसकाळ’, ‘पाडा’, ‘फाटलेलं आभाळ’, अशा ज्या समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत त्यातील पात्रे तर या कृषीतील समस्यांसमोर पूर्णपणे पराभूत झाल्याची दिसतात. गोमंकतीय पार्श्वभूमीवरील ‘भगदाड’ या कादंबरीत मात्र संघर्ष करून शेतकऱ्यांचा विजय झाल्याचे दिसते. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ सारख्या कादंबऱ्यांतून पारंपरिक कृषी संस्कृतीचे दर्शन होते व परस्परांवर असणारा अविश्वास, एकमेकांचे पाय ओढणारे आणि सत्ता मिळाल्यावर तिचा गैरफायदा घेणारे, फसवाफसवी करणारे आणि यातून एकूण एकत्र कुटुंबाच्या उद्ध्वस्ततेला कारणीभूत ठरणारी काशीनाथ आणि विश्वनाथ ही पात्रे या कादंबरीतून चित्रित झाली आहेत. दुय्यम स्वरूपाची अनेक पात्रे या कादंबऱ्यांतून येतात. ती दुय्यम स्वरूपाची असली तरी कादंबरीच्या कथानकाची अंगभूत घटक म्हणून ती कादंबरीत येताना दिसतात. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून येणारी स्त्रीपात्रे देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ‘गावठाण’, ‘जिनगानी’, या कादंबऱ्या स्त्री प्रधान आहेत. ‘गावठाण’ मधून एका स्त्रीच्या फरफटीचे चित्रण आत्यंतिक संवेदनशीलतेने करण्यात आले आहे. लेखकांने आंदीचे पात्र एवढ्या नैसर्गिक पद्धतीने रंगविले आहे व त्या पात्राचा कादंबरीतील जो विकास दाखवला आहे तो निश्चितच या कादंबरीला वरच्या स्थरावर घेऊन जाणारा आहे. फक्त कादंबरीचा शेवट लेखक परिणामकारक करू शकलेला नाही. ‘जिनगानी’ ही कादंबरी राधाबाई या पात्राभोवती फिरते परंतु हे पात्र तेवढे परिणामकारक झाल्याचे दिसत नाही. इतरही अनेक

कादंबऱ्यांतून आलेली स्त्रीपात्रे चित्तवेधक झाली आहेत. 'बारोमास' मधील अलका व शेवंतामाय, 'ऐसि कुणबी भूपाळ' मधील उर्मिला, सुनंदा, गंगू, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील उषा, अशी अनेक पात्रे सांगता येतील जी या कादंबऱ्यांमधून अत्यंत महत्वाची पात्रे म्हणून समोर येताना दिसतात.

खलस्वरूपाची पात्रे तशी फारच क्वचित आली आहेत. 'बोडखी' मधील गावपाटील, 'भगदाड' मधील ठेकेदार, अशी काही मोजकीच ज्याला खलपात्रे म्हणता येतील अशी आहेत. अन्यथा निसर्ग हाच कृषीव्यवस्थेत खलपात्र बनून येताना दिसतो. कधी व्यापारी तर कधी सरकार देखील या कादंबऱ्यांतून खलपात्रे झालेली दिसतात.

कथानकाला गती देण्याचे व पात्रांचे स्वभावधर्म व्यक्त करण्याचे काम कादंबरीतील संवाद करतात. संवादातून काळाचे दर्शन देखील होते. अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्या या संवादप्रधान आहेत. 'वाहतं पाणी' सारख्या कादंबरीचे सर्वच कथानक बहुतांशी संवादातून पुढे जाताना दिसते. अनेक कादंबरीतील पात्रांची मनोवस्था त्यांचे जे स्वतःशीच संवाद होतात त्यातून दिसून येते. या संदर्भात 'बारोमास' मधील एकनाथ व 'तणकट' मधील कबीर हे दोन पात्रे पाहण्यासारखी आहेत. पात्रांच्या परस्पर संवादातून देखील पात्रांची मानसिकता दिसून येते. या संदर्भात 'चाळेगत' मधील लेखक व त्याचा मित्रपरिवार यामधील संवाद पाहण्यासारखे आहेत यामधून त्यांची मानसिकता तर लक्षात येतेच पण त्याच बरोबर, व्यतीत होणारा काळ त्यांच्या मानसिकतेत कसा बदल घडवून आणतो हे देखील लक्षात येते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील यशानाना आणि त्याची पत्नी यामधील त्यांनी आत्महत्या करण्या अगोदर त्यांचे जे बोलणे होते ते संवाद अंगावर काटा आणणारे आहेत. एकूणच ग्रामीण कादंबऱ्या या संवादप्रधान असतात असा निष्कर्ष अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर कादंबऱ्यांचा अभ्यास करता काढता येतो.

कोणत्याही कादंबरीतील भाष्य हे लेखकाचे चिंतन असते. यामधून त्याची लिहिण्यामागील भूमिका तर स्पष्ट होतेच त्याच बरोबर जगण्याबद्दलची त्याची कल्पना आणि त्याची नैतिक भूमिका देखील स्पष्ट होत असते. 'बारोमास', 'तणकट', 'चाळेगत', 'ऐसे कुणबी भूपाळ' या कदंबऱ्यातून लेखकाचे जीवनविषयक भाष्य अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झालेले दिसते. 'तणकट' मधून जो जातीय संघर्ष चित्रित झाला आहे. त्याची कारणमीमांसा लेखक अनेकवेळा पात्रांच्या चिंतनातून करताना दिसतो. निवेदनाच्या माध्यमातून लेखक जास्त भाष्य करीत नसला तरी कबीर, आक्काबा राणे, बल्लाळ, अशा पात्रांच्या चिंतनाच्या माध्यमांतून किंवा अनेकवेळा दलित मित्र, कबीर व त्याचे सवर्ण मित्र, अशा चर्चांमधून देखील लेखक आपले भाष्य करताना दिसतो. 'बारोमास' मधून देखील बदललेली परिस्थिती, बेरोजगारी, शेतीविषयक सरकारी धोरणे, हायब्रीड बियाणी, शेतीचे आधुनिकीकरण,

बाजारभावाचा प्रश्न, आजच्या तरूणाची झालेली विमनस्क अवस्था अशा अनेक गोष्टींबद्दलचे लेखकांने या कादंबरीत केलेले भाष्य लेखकाच्या सखोल चिंतनशीलतेचा दाखला देणारे आहे. जीवनविषयक भाष्य करण्यासाठी काहीकडे लेखकांने केलेला रोजनिशीचा वापर किंवा महानुभाव शैलीतून केलेले लेखन याची विशेष नोंद घेतली पाहिजे. 'चाळेगत' ही देखील आजच्या एकूण बदलत्या परिस्थितीवर भाष्य करणारी अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. जागतिकीकरणाचे जे पडसाद ग्रामीण भागातील पारंपरिक जीवनावर व व्यवसायावर उमटले आहेत त्याचे अनेकविध कंगोऱ्यांसह विश्लेषण करताना एकूण बदलत्या परिस्थितीविषयक लेखकांने केलेले भाष्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे बदले राजकीय मानस, समाजवादी चळवळीला लागलेली उतरती कळा आणि अस्मितांचे राजकारण करणाऱ्या पक्षांचे वाढलेले प्राबल्य, राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकारण, अभिव्यक्तीची होणारी गळचेपी या सर्वा संदर्भात कधी पात्रांच्या माध्यमातून तर कधी निवेदनाच्या माध्यमातून लेखकांने केलेले भाष्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ही कादंबरी एक नैतिक भूमिका घेऊन लेखकांने लिहिलेली आहे परंतु लेखकांने जे भाष्य केले आहे त्यामधून लेखकाची भूमिका एकांगी नाही हे देखील लक्षात येते. 'बारोमास' मधून आजच्या एकूण कृषी व्यवस्थेसंबंधी लेखकांने जे भाष्य केले आहे ते सर्वांनाच अंतर्मुख करणारे आहे. हे भाष्य कधी मुख्यपात्राच्या चिंतनातून तर अनेकवेळा काही पात्रांच्या संवादातून व्यक्त झाले आहे. एकूण आज शेती हा आज आतबट्ट्याचा व्यवहार झाला असून. शेती परवडणारी नाही आणि शेतीवर विसंबून कोणीही आपली उपजीविका करू शकत नाही हे या एकूण या कादंबरीतून व्यक्त झालेल्या लेखकच्या चिंतनाचे सार आहे असे म्हणता येते. याच म्हणून नव्हे, तर सर्वच कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले भाष्य आपणाला याच निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे आहे आणि हीच खरी आजच्या शेतीची शोकांतिका आहे असे निश्चितपणे म्हणता येते. लेखकांनी आपले भाष्य करीत असनाना त्या भाष्याला अनुरूप अशा आभिव्यक्तीच्या पद्धती वापरल्या आहेत. त्यामुळे लेखकाचे भाष्य आणि ती व्यक्त करण्यासाठी वापरलेली अभिव्यक्तीची पद्धत यात एक अंतर्गत संगती असल्याचे दिसते त्यामुळे कादंबरीच्या भाषिक अंगाचा विचार करीत असताना देखील 'भाष्य' या आंगाचा विचार महत्त्वाचा ठरतो हे लक्षात येते. भाषिक अभ्यासाचा विचार करीत असताना विविध ग्रामीण बोलींचा केलेला वैविध्यपूर्ण वापर हे या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. मराठवाडा, विदर्भ, कोल्हापूरचा प्रदेश, कोकण, खानदेश अशा विविध भागातील स्थानिक बोलींचा त्या त्या परिसरातील लेखकांनी आपल्या कादंबरी लेखनात अत्यंत चपखलतेने वापर करून घेतला आहे. प्रमाण मराठी पेक्षा वेगळया स्वरूपाची असलेली वाक्य रचना. प्रमाण भाषेत वापरात असलेल्या शब्दाऐवजी बोली भाषेत होणाऱ्या दुसऱ्याच शब्दाचा वापर. त्या त्या ठिकाणच्या स्थानिक बोलीतील

वैशिष्ट्यपूर्ण शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांनी तर हे सर्वच लेखन अत्यंत संमृद्ध झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बोलींचा वापर लेखनासाठी केलेला असला तरी या कादंबऱ्यांची वाचनीयता कुठेही खंडीत झाल्याचे दिसत नाही. बोलीच्या वापरामुळे अनेक आजपर्यंत अपरिचित अललेल्या शब्दांची ओळख मुख्य प्रवाहातील वाचकाला होते व मराठीची भाषिक संमृद्धता पाहून तो थक्क होतो. नव्वदोत्तर कादंबऱ्या भाषिक अंगाने देखील संमृद्ध असून अभिव्यक्तीच्या विविध शक्यतांचा विचार नव्वदोत्तर काळातील लेखकांनी करण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीला संमृद्धता प्राप्त झाली आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

प्रकारण -5

# उपसंहार व निष्कर्ष

'नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास: निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात' हा विषय संशोधनासाठी घेण्यामागे. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा सर्वांगाने विचार करून काही निष्कर्ष मांडावेत व एकूणच मराठी ग्रामीण कादंबरीच्या आकलनाच्या कक्षा विस्तृत कराव्यात हा उद्देश होता. या अभ्यासामुळे नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचे आकलनात नक्कीच भर पडणार आहे असा विश्वास वाटतो.

नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा विचार करता पूर्वाश्रमीच्या ग्रामीण कादंबरीपेक्षा वेगळी किंवा त्या कादंबरीचा कोणताच ठसा नसणारी अशाप्रकारची ग्रामीण कादंबरी नव्वदोत्तर काळात लिहिली गेली असे दिसून येते. आशय आणि काही प्रमाणात आविष्कार या दोन्ही मध्ये ती पूर्वाश्रमीच्या कादंबरीपेक्षा भिन्न असल्याचे दिसते. वास्तवदर्शन हे एकूणच ग्रामीण कादंबरीचे महत्त्वाचे लक्षण राहिले असले तरी, नव्वदोत्तर कादंबरी ग्रामीण जगण्यातील किंवा नव्या बदलांनी ग्रामीण जगण्यात संक्रमित केलेले भिषण वास्तव नव्वदोत्तर कादंबरी अधिक प्रखरतेने मांडताना दिसते. महत्त्वाचे म्हणजे, ग्रामीण माणसाच्या जगण्याला वेगवेगळ्या बाजूंनी नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी स्पर्श करताना दिसते. ग्रामीण भागातील एकत्र कुटुंबपद्धतीचा कोसळणारा आलेख त्यांच्यामधून ज्या प्रकारे व्यक्त होतो त्याच प्रकारे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांची समस्या, शेतीबद्दलचा युवा पिढीचा उदासीन दृष्टिकोन, न परवडणारी शेती, दोन पिढ्यांतील संघर्ष, ग्रामीण स्त्रीचे जगणे, नगदी पिकांचा चकवा, ग्रामीण परिसरातील राजकारण, शेतकऱ्याला त्याच्या भूमितूनच उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न व त्यासाठी शेतकरी देत असलेला लढा, शेती सोबतच मच्छिमारी किंवा तत्सम उद्योग करून आपले पोट भरणाऱ्या ग्रामीण माणसाची व्यथा, ग्रामीण परिसरातील उद्ध्वस्त होऊन देशोधडीला लागलेला कारागीर, प्रदुषणकारी प्रकल्प, खाण उद्योग यामुळे गावाला येणारे उद्ध्स्तपण, अशा असंख्य विषयांना नव्वदोत्तर कादंबरी स्पर्श करताना दिसते. हे सगळे विषय म्हणजे बदलत्या वास्तववाचे ग्रामीण लेखकांनी घडविलेले भीषण असे वास्तव दर्शन आहे, असेच म्हणावे लागते. नव्वदोत्तर कळात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने ग्रामीण भागावर किती खोल परिणाम केला आहे, किंबहुना शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या दिवसेंदिवस दुर्धर होत जात असलेल्या या अवस्थेला हे जागतिकीकारण कसे कारणीभूत आहे याचे विश्लेषणच प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष रित्या या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्या करताना दिसतात. लेखकाचा परिस्थितीकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन, हा देखील नव्वदोत्तर कादंबरीचा विशेष म्हणून सांगता येतो. नष्ट होणारे ग्रामीण व्यवस्था व त्या बद्दलचे भाबडे दुःख हा नव्वदपूर्व ग्रामीण कादंबरीचा विशेष होता, या

संदर्भात आनंद यादव यांच्या ‘गोतावळा’ कादंबरीचे उदाहरण घेता येईल. परंतु नव्वदोत्तर काळातील ‘ऐसें कुणबी भूपाळ’ सारख्या कादंबरीतून मात्र, शेतकऱ्यांच्या आजच्या परिस्थितीस शेतकरीच कसा जबाबदार आहे, या संदर्भात भारत काळे सारखा लेखक कठोर आत्मपरीक्षण करून आपले लेखन करताना दिसतो. एकत्र कुटुंबपद्धती उगाच टिकवू ठेवण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा, काट्याचा नायटा होण्या अगोदर जमिनीच्या, घराच्या वाटण्या झाल्यास; भावाभावात कायमी कटुता निर्माण होणार नाही, भावाभावातील नात्यांमधील गोडवा कायम टिकून राहील, लेखक हेच नेमकेमणाने अधोरेखित करताना दिसतो. लेखकाचे हे आकलन नव्वदपूर्व ग्रामीण कादंबरीतील आकलनापेक्षा निश्चितच वेगळ्या स्वरूपाचे आहे. ‘चाळेगत’, ‘बारोमास’, या कादंबऱ्यांमधून जागतिकीकरणाचे कृषी क्षेत्रावर होणारे घातक परिणाम अधोरेखित झाले आहेत. प्रवीण बांदेकर किंवा सदानंद देशमुख या लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांमधून हे नेमकेपणांने दाखवून दिले आहे. बदलत्या व्यवस्थेसमोर आज सगळ्यांनाच कसे शरण जावे लागत आहे, याचे त्यांनी केलेले विश्लेषण आपणाला अंतर्मुख करणारे आहे, या वर्णनातून जागतिकीकरणाचे विद्ध्वंसक रूप आपल्यासमोर उलगडत जाते. जागतिकीकरणाच्या माध्यमातून आलेली ही नवी व्यवस्था सामान्य माणसाच्या जगण्याची कोंडी कशी करते ते या कादंबऱ्यांमधून व्यक्त होते. मच्छिमारांच्या हातून त्यांचा पारंपरिक व्यवसायच ओढून घेतला जातो तर कृषीचा मिळकतीपेक्षा खर्च अधिक होत असल्याने शेतकऱ्यांसमोर कर्जबाजारी होऊन आपले शेत विकण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय त्याच्यासमोर शिल्लक राहत नाही किंवा तो आत्महत्येच्या टोकाकडे तरी जातो. यंत्रावर तयार होणारा माल गावात येऊ लागला आणि गावातील कारागीर बेकार झाले. एकूणच बदलती जागतिक व्यवस्था ग्रामीण व्यवस्थेवरच कसा परिणाम करते हे यातील बहुतेक कादंबऱ्यांनी दाखवून दिली आहे. वास्तवाची मांडणी या कादंबऱ्यांतून झालीच आहे व हे बदलते वास्तव भयानक असून शेतकरी, कष्टकरी समाजाला मुळापासून उखडून टाकणारे आहे हे दाहक सत्य या कादंबऱ्या मांडतात. आज शेतकऱ्याला आत्महत्येपर्यंत ही व्यवस्था कशी घेऊन जाते याचे विश्लेषण आणि वर्णन या कादंबऱ्यांमधून आले आहे. बदलत्या वास्तवाचा आलेख नेमकेपणांने मांडून भाबडा आशावाद पूर्णपणे निपटून काढून शेतकरी-कष्टकरी समाजाचे वास्तव उघडे करून नव्वदोत्तर मराठी कादंबरी दाखवित असल्याने, साठोत्तरी कादंबरीचा विचार करत ती नक्कीच पुढच्या पायरीवर गेली आहे असे म्हणता येते.

नव्वदोत्तर कादंबरी भिषण वास्तव मांडते परंतु ‘ग्रामीण कादंबरी’ म्हणून ती निश्चिच असे तत्त्वज्ञान मांडताना किंवा नेमका असा काही मूल्यविचार देताना दिसून येत नाही. अर्थात, काही कादंबऱ्या याला अपवाद आहेत व त्या काही एक मूल्यविचार देताना देखील दिसतात. ‘चाळेगत’, ‘तणकट’ या कदंबऱ्या काही एक मूल्यविचार देतात किंवा या

कादंबऱ्या वाचत असताना वाचकाला देखील विचार प्रवृत्त करतात. कादंबरी लिहीत असताना लेखकांची काही एक मूल्यदृष्टी व्यक्त होत असते किंवा लेखकांने काही एक मूल्यदृष्टी घेऊन लेखन करणे अपेक्षित असते. अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता या सर्वच कादंबऱ्यांचे लेखन काही एक मूल्यदृष्टी ठेवून झाले आहे किंवा या कादंबऱ्यंचे लेखन काही एक नैतिक भूमिका घेऊन झाले आहे असे दिसत नाही परंतु काही कादंबऱ्यांचे लेखन मात्र अशी नैतिक भूमिका घेऊन झाल्याचे दिसते. लेखकाची नैतिक भूमिका म्हणजे लेखकाचा जगण्याविषयीचा दृष्टिकोन असतो असेही म्हणता येते. 'तणकट' सारख्या कादंबरीतून लेखकाचा हा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. जाती-जाती मधील संघर्षाची मांडणी करीत असतानाच स़घर्षातून नव्हे तर समन्वयातून आपणाला पुढील वाटचाल करावी लागेल, हा या कादंबरीतून व्यक्त होणारा दृष्टिकोन ही लेखकची नैतिक भूमिका आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' मधील लेखकाची भूमिका ही लेखकाची नैतिकता व्यक्त करणारी आहे असे निश्चित म्हणता येते. एकत्र कुटुंबपद्धती टिकली पाहिजे हा भाबडेपणा न जपता योग्यवेळी योग्य पद्धतीने जमीन व घराच्या वाटण्या झाल्यास नात्यातील गोडवा कायम राहील हा लेखकाचा दृष्टिकोन म्हणजे त्याची लेखक म्हणून असलेली नैतिक भूमिकाच आहे. ही त्याची भूमिका ही प्रस्थापित मूल्यव्यवस्थेच्या विरोधात आहे असेही वाटू शकते परंतु कालसापेक्ष अशी, ही लेखकाची नैतिक भूमिका आहे. अर्थात, सर्वच कादंबऱ्यांतून लेखकाची म्हणून असलेली नैतिक भूमिका व्यक्त होतेच असेही दिसत नाही. अनेक कादंबऱ्या या रिपोर्ताज पद्धतीने लिहिलेल्या आहेत. जे घडले, जसे घडले तसे सांगणे ही त्यामागील लेखकाची भूमिका असल्याचे दिसते. यामधून वास्तवाचे दर्शन होते परंतु या वास्तवाबद्दलचे लेखकाचे आकलन व या वास्तवात परिवर्तन व्हावे म्हणून काय करता येईल, याबद्दलचा कोणताच दृष्टिकोन व्यक्त होताना दिसत नाही. ज्या वेळी लेखक नैतिक भूमिका घेऊन लेखन करतो तेव्हा तो या परिस्थिती बदलण्यासाठीच्या काही दिशा देखील सूचित करताना दिसतो. या संदर्भात 'बारोमास' कादंबरीचे उदाहरण घेता येईल. आज शेती करणे अशक्य आहे, शेतीतील जगणे म्हणजे नरक आहे याची तीव्र जाणीव ही कादंबरी देतेच पण ही जाणीव देतानाच कादंबरीच्या शेवटी एकनाथ शेतकरी आंदोलनात सक्रीय होताना दिसतो. संघर्ष केल्यास शेतकऱ्याला पुन्हा चांगले दिवस येतील पण यासाठी शेतकरी संघटन आवश्यक आहे हा विचार ही कादंबरी देते. पारंपरिक शेतीची गुणवैशिष्ट्ये लक्षात घेऊन आधुनिकतेचा स्वीकार शेती व्यवसायात करावा लागेल, हे जे लेखक सुचवतो ते ही तेवढेच महत्त्वाचे आहे. लेखकाची नैतिक भूमिका या सर्वातून व्यक्त होते असे म्हणता येते. 'चाळेगत' मधून देखील आजची व्यवस्था सर्वसामान्याचे जगणे अशक्य करणारी आहे याची प्रचिती ही कादंबरी पुन्हा पुन्हा देते. त्याच बरोबर, ही कादंबरी लेखक ज्या चळवळीचा पुरस्कर्ता आहे त्या

समाजवादी चळवळीची देखील कठोर समीक्षा करताना दिसते. 'कृतीशून्य राजकारणापेक्षा मूल्यविचार नसलेले कृतीशील राजकारण लोकांना पसंत असते' हा लेखकांने काढलेला निष्कर्ष सर्वांनाच अंतर्मुख करणारा आहे. या कादंबरीच्या शेवटी 'देसरूढी' काढण्याच्या प्रथेचे केलेले वर्णन हे प्रतिकात्मक व लेखकाच्या नैतिक भूमिकेचे विश्लेषण करणारे आहे. आता आपल्या वैचारिकतेची 'देसरूढ' काढण्याची गरज आहे. आपण आपला स्वार्थी, संकुचित विचार, स्वतःपुरते पाहण्याची वृत्ती न सोडल्यास आपला अंत नक्की आहे. देसरूढ काढून गावातील कचरा जाळला जातो तसाच आमच्या विचारांना आलेली मलिनता जाळून न टाकल्यास विचारांचे मालिन्य तसेच राहणार असून चांगला विचार कोणाच्याही मनात रूजणेच अशक्य होऊन जाईल. आज प्रत्येकाने आपली स्वतःची 'देसरूढ' काढली पाहिजे आणि हे न झाल्यास आपल्या जमिनी, आपला समुद्र या सर्वाला आपण पारखे होणार आहोत. माणसाला त्याच्या मुळापासून उद्ध्वस्त करणारी ही व्यवस्था आपणाला जगू देणार नाही हा प्रतिकात्मकतेतून व्यक्त होणारा आशय हा लेखकांने स्वीकारलेल्या नैतिक भूमिकेचा परिपाक आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

बोली भाषांचा व्यापक प्रमाणात होऊ लागलेला वापर हे नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. साठोत्तर काळातच बोलीचा वापर साहित्यातून होऊ लागला होता 'धग' सारखी कादंबरी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. ऐंशी नंतरच्या ग्रामीण लेखकांनी निवेदनासाठी देखील बोलीचा वापर सुरू केल्याचे दिसते. नव्वदोत्तर कादंबरीचा विचार करता ही कादंबरी ज्या परिसरात घडते त्या परिसरातील बोली भाषेचा गोडवा घेऊनच येताना दिसते. एकाच बोलीतील विविध छटा विविध कादंबरीतून व्यक्त होताना दिसतात. भाषा आणि प्रदेश यांचे एक अभिन्न नाते असल्याने भाषा त्या प्रदेशाला जीवंत करते. भाषा अनेकवेळा त्या प्रदेशाची मानसिकता देखील व्यक्त करीत असते. हे सर्व लक्षात घेता, नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील भाषेचा लेखकांनी वापर अगदी जाणीवपूर्वक केला आहे असे दिसून येते. मराठी ग्रामीण कादंबरीला पुढील टप्प्यावर घेऊन जाण्यास या भाषेचे मोठे योगदान आहे. गोमंतकीय लेखकांनी मात्र 'स्थानिक बोलीचा संवादात देखील न केलेला वापर' ही खूप मोठी उणीव म्हणून सांगता येते. कदाचित गोमंतकातील भाषिक संघर्षाची पार्श्वभूमी या सर्वाला असावी. मी अभ्यासाला निवडलेल्या कादंबऱ्यांमध्ये ही उणीव दिसत असली तरी आता नव्या दमाच्या लेखकांनी ज्या कादंबऱ्या गोव्यात लिहिल्या आहेत उदा- 'ओरबिन' किंवा 'खाण माती' या कादंबऱ्यांमधून मात्र संवादासाठी स्थानिक भाषेचा वापर करण्यात आला आहे. स्थानिक बोलीचा संवादात वापर झाल्याने भाषिकदृष्ट्या विचार करता, या कादंबऱ्या अधिक जीवंत वाटतात.

हा आढावा घेतल्यानंतर आता एकूण प्रबंधलेखनाचा आढावा घेणे किंवा निष्कर्ष मांडणे आवश्यक आहे. ग्रामीण कादंबरीचा विचार करता हे मराठी कादंबरीला लाभलेले सर्वात मोठे 'देशी परिमाण' आहे. मुख्यधारेतील मराठी साहित्याच्या परंपरा या इंग्रजी साहित्यातून अवतरल्या आहेत. मराठी साहित्य विविध टप्प्यावर जी परिवर्तने आली ती देखील इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून आली हे दाखविता येते. ग्रामीण साहित्याची निर्मिती मात्र या ठिकाणचा सामान्य माणूस, त्याचे जगणे, त्याचा परिसर, त्याच्या आवतीभोवतीचे वातावरण, या मातीशी असलेले त्याचे ऋणानुबंध, त्याचे इतर पाळीव प्राणी एवढेच नव्हे तर झाडे-पेडे या सर्वांशी असलेले नाते या सर्वातून होताना दिसते. ग्रामीण माणसाची निसर्गसन्मुख वृत्ती देखील या साहित्यातून अधोरेखित होते. समूह जीवनाचे जे चित्रण ग्रामीण साहित्यातून होते त्याचे दर्शन मुख्य धारेतील मराठी साहित्यातून होताना दिसत नाही. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा या देखील येथील लोक परंपरेत त्याच बरोबर म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने जे प्रबोधन युग सुरू झाले त्यात आहेत असे दिसते त्यामुळे मुख्यधारेतील मराठी साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांच्या प्रेरणा वेगळ्या आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा या येथील देशी परंपरेतून निर्माण झाल्या आहेत हे अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीचा विचार करता ज्याला आपण खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरी म्हणू ती ग्रामीण कादंबरी 1960 नंतरच लिहिली जाऊ लागली. साठोत्तरी काळातील ग्रामीण लेखक आपण ज्या परिसरात लहानाचा मोठा झाला तो परिसर, त्या ठिकाणचे वातावरण, त्या ठिकाणचा निसर्ग, त्या ठिकाणच्या लोक परंपरा, त्या ठिकाणची माणसे, कृषी आधारित जीवन, गावगाड्याचे विविध घटक व त्यांचे परस्पर संबंध, जातीच्या उतरंडी, ग्रामीण माणसावर दबाव टाकणारे विविध घटक, या सर्वाला आपल्या लेखनातून व्यक्त करू लागला. हे व्यक्त करण्यासाठी त्यांने शक्य तेवढ्या प्रमाणात त्या ठिकाणच्या बोली भाषेचा उपयोग केला त्यामुळे आशय आणि आविष्कार या दोन्ही अंगांनी ग्रामीण साहित्य हे मुख्यधारेतील साहित्यापेक्षा वेगळे राहिल्याचे दिसते. सुरूवातीच्या काळात या साहित्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्याचा उपहास देखील केला गेला परंतु नव्वदोत्तर साहित्याचा विचार करता आज ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह होऊ पहात आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

साहित्याची निर्मिती हा मानवाच्या भाषिक विकासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मानवी संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणून भाषा आणि त्या भाषेतून निर्माण झालेले साहित्य पुढे येते. संस्कृतीचे वहन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करण्याचे कार्य भाषा करते व हे करीत असताना साहित्य हे भाषेचे सर्वात महत्त्वाचे अंग म्हणून समोर येते. माणसाचे व्यक्त होणे आणि ते शब्दाच्या माध्यमातून संकलित करणे भाषेमुळे शक्य

होते. हे जे संकलन होते त्यातूनच साहित्य आकाराला आलेले दिसते. कालानुरूप अनेक अवस्थरांतून जातजात आज साहित्य आजच्या अवस्थेत येऊन पोहचले आहे. आज साहित्याच्या कक्षा रुंदावत असून साहित्याला अनेक नवीन आयाम प्राप्त होत असल्याचे दिसते. कथात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म हे साहित्याचे तीन मूलबंध म्हणून सांगितले जातात व या आधारेच साहित्याचे वर्गीकारण केले जाते. 'कादंबरी' हा कथात्म मूलबंधाचा एक प्रकार आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार पाश्चात्त्य परंपरेतून मराठीत विकसित झाला. भारतात इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर या ठिकाणच्या नवशिक्षीत पिढीचा इंग्रजी वाङ्मयाशी संपर्क आला व त्यातूनच कादंबरी स्वरूपाच्या लेखनाला मराठीत सुरूवात झाली. अर्थात, आपल्या या ठिकाणची महाकाव्ये, खंडकाव्ये, पोवाडा, बखर वाङ्मय या सर्वातून कादंबरीची बीजे शोधता येतात. आजच्या कादंबरी वाङ्मयाचे स्वरूप लक्षात घेता, ती पाश्चात्त्य प्रभावातून विकसित झाली आहे असे निश्चितपणे म्हणता येते. मराठी साहित्याचा विचार करता, हा वाङ्मयप्रकार मराठीत जसजसा स्थिरावू लागला तसतसे त्याचे उपप्रकार देखील निर्माण होऊ लागले. त्या उपप्रकारातील 'ग्रामीण कादंबरी' हा महत्त्वाचा उपप्रकार आहे. ग्रामीण कादंबरीचा विचार करता, ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणा मध्यवर्ती प्रवाहातील कादंबऱ्यांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या असल्याचे दिसतात. ग्रामीण कादंबरी ही अधिक देशी जाणिवेतून आविष्कृत होते असे दिसून येते. ग्रामीण कादंबरी ही नैसर्गिक, भौगोलिक, प्रादेशिक वैशिष्ट्ये घेऊन अवतरते व हे करत असतानाच, लोकसंस्कृती, लोकभाषा यातील संमृद्ध जाणिवा देखील ती व्यक्त करते. सामुहिकता हा ग्रामीण भागाचा स्थायिभाव आहे व ती सामुहिकता ग्रामीण कादंबरी लेखनातूनही दिसून येते. ग्रामीण माणसाच्या जगण्यावर अनेक घटक परिणाम करीत असतात. ग्रामीण परंपरा आणि संस्कृती, शहरी जीवननापेक्षा पूर्णतः भिन्न असल्याने, ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा या मुख्य प्रवाहातील साहित्यापेक्षा निश्चितच वेगळ्या आहेत. कृषिकेंद्रीतता हे ग्रामीण कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सांगता येते. ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना जाणवणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, नव्वदोत्तरकाळात ग्रामीण कादंबरी हा मराठी कादंबरी वाङ्मयातील सर्वात सशक्त प्रवाह म्हणून पुढे येत असल्याने, ग्रामीण कादंबरीकडे आता फक्त एक विशेषण म्हणून पाहता येत नाही तर त्याच्याकडे आशयिक मूल्य म्हणूनच पहावे लागते. भाषिक अंगाने विचार करता, कादंबरीच्या अभिव्यक्तीसाठी बोली भाषेचा होणारा वापर हे ग्रामीण कादंबरीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. बोली भाषेच्या वापरामुळे ग्रामीण कादंबरी अधिक जीवनाभिमुख झाली आहे असेही म्हणता येते.

मराठीतील ग्रामीण कादंबरीच्या विकासाचा विचार करताना काही निश्चित प्रेरणांमधून मराठी कादंबरी विकसित झाली आहे हे दिसून येते. लोकसाहित्याची ग्रामीण भागात असणारी संमृद्ध परंपरा, म.जोतिबा फुले व डॉ.

बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, या सर्वांच्या प्रेरणेतून प्रारंभीच्या काळातील मराठी कादंबरी विकसित झाल्याचे दिसते. ग्रामीण साहित्य हा लेखकाच्या अनुभवाचा जगण्याचा अविभाज्य भाग असल्याने तो आत्यंतिक जिव्हाळयांने हे लेखन करतो, त्यामुळेच तो परिसर, तेथील निसर्ग, आणि तेथील माणसे जिवंत होऊन ग्रामीण साहित्यातून अवतरतात. ग्रामीण कादंबरी लेखनांत हे विशेषत्वाने या सर्व प्रेरणांमधून होताना दिसते. सुरूवातेचे काही मोजके अपवाद सोडल्यास 1960 पर्यंत मराठीतील ग्रामीण कादंबरी ही मनोरंजनाच्या अंगानेच जाणारी होती. 'धग' सारख्या कादंबरीने ग्रामीण कादंबरीला स्वतःची ओळख दिली आणि त्यानंतर वास्तववादी ग्रामीण कादंबरी लेखनाचे एक नवीन पर्व मराठी कादंबरीच्या क्षेत्रात निर्माण झाले. आनंद यादव व त्यांच्या इतर काही सहकाऱ्यांनी 1977 मध्ये ग्रामीण साहित्याच्या चळवळीला प्रारंभ केला. मुख्यप्रवाहातील साहित्यात ग्रामीण लेखकांची जी उपेक्षा होते ती दूर करून ग्रामीण साहित्य व ग्रामीण लेखक याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व या साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी ही चळवळ सुरू झाली. या चळवळीने ग्रामीण साहित्याला स्वतःची ओळख, स्वतःचे तत्त्वज्ञान देण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रमाणे 'दलित साहित्याची चळवळ आणि त्यातून दलित साहित्याची निर्मिती' असा क्रम दिसून येतो तसे काही ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत झालेले दिसत नाही. ग्रामीण साहित्याच्या लेखनाला अगोदरच सुरूवात झाली होती व ग्रामीण साहित्याची चळवळ नंतर सुरू झाली. ग्रामीण साहित्याच्या पुरस्कर्त्यांनी आपले प्रेरणास्थान म्हणून म. जोतिबा फुले यांचे नाव घेतले असले तरी फुल्यांचा बहुसंस्कृतिवाद व चिकित्सक दृष्टिकोन ग्रामीण कादंबरीला स्वीकारता आला नाही, हे वास्तव आहे. तसे कोणतेच तत्त्वज्ञान ही ग्रामीण साहित्याची चळवळ ग्रामीण साहित्याला व पर्यायाने ग्रामीण कादंबरीला देऊ शकली नाही परंतु ग्रामीण लेखकाचे आत्मभान जागवण्याचे, त्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचे व त्याला त्याचे हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य या चळवळीने केले एवढे मात्र निश्चित!

नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा विचार करता तीव्र होत चाललेल्या जीवनसंघर्षाचे चित्रण ही कादंबरी आता अधिक सखोलतेने करताना दिसते. शेती व्यवसायातील समस्या वाढल्या आहेत त्याच बरोबर ग्रामीण जीवनातही अनेक नवीन समस्या निर्माण होत आहेत. सुशिक्षितांची बेकारी ही सध्या ग्रामीण जीवनातील मोठी समस्या आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या 'तणकट', 'बारोमास', 'एसईझेड', 'जिनगांनी', 'चाळेगत', अशा अनेक कादंबऱ्यांतून हा प्रश्न तीव्रतेने समोर आला आहे. शेतीतील समस्या हा विषयही अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहे. 'साखरफेरा', 'फाटलेले आभाळ', 'पाडा', 'कापूसकाळ', 'बारोमास', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' अशा अनेक कादंबऱ्या या ग्रामीण जीवनांतील समस्याप्रधानतेचे चित्रण करताना दिसतात. विशिष्ट

तत्त्वज्ञान घेऊन नव्वदोत्तर कादंबरीचे लेखन झाले आहे असे मात्र दिसत नाही. ‘विशिष्ट तत्त्ववज्ञान घेऊन लेखन करण्याच्या बाबतीत मराठी ग्रामीण कादंबरी दुबळी आहे.’ असे जे डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्यासारख्या समीक्षकांनी म्हटले आहे ते ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात देखील लागू पडणारे आहे. अर्थात, नव्वदोत्तर काळात देशीवादाचे एक नवे परिमाण या कादंबरीला मिळाले आहे. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तुत केलेले हे प्रारूप नव्याने कादंबरी लेखन करू लागलेल्या लेखकांना चांगलेच भावल्याचे दिसते. आजची मराठी ग्रामीण कादंबरी देशीवादाच्या अंगानेच पुढे जात असल्याचे दिसते. म. फुल्यांचे तत्त्वज्ञान किंवा देशीवादी जाणिवा मराठी ग्रामीण कादंबरीकार आपल्या सोयीनुसार स्वीकारताना दिसतो. अनेक वेळा, देशीवादाचा आधार घेऊन चिकित्सा टाळताना दिसतो. ग्रामीण मराठी कादंबरीला भविष्यात निश्चित अशी तात्त्विक भूमिका घेऊन पुढे जायचे असेल तर, फुल्यांचा चिकित्सावाद, बहुसंस्कृतीवाद, देशीवादी जाणिवा, आपल्या लोकपरंपरा आणि लोकमानस या सर्वाचा समन्वय साधत पुढे जावे लागेल. राजन गवस, प्रवीण बांदेकर अशा काही कादंबरीकारांनी यादृष्टीने केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता याचा समन्वय साधूनच ग्रामीण जीवनातील कठोर वास्तवाला भिडण्याचा प्रयत्न ग्रामीण कादंबरीकारांनी करणे अगत्याचे आहे. हे सहज घडणारे नसले तरी, ही भूमिका घेऊन ग्रामीण कादंबरी लेखकांनी सातत्यांने आपले लेखन केल्यास, मराठी ग्रामीण कादंबरी स्वतःचे निश्चित असे तत्त्वज्ञान निर्माण करू शकेल आणि तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मराठी कादंबरी दुबळी आहे हा शिक्का देखील पुसला जाऊ शकेल.

प्रबंधाचा विषय नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी असा आहे. त्यामुळे यातून एका विविक्षित कालखंडाचा अभ्यास अभिप्रेत आहे हे निश्चितच आहे. एखादा विशिष्ट कालखंड व त्या आलखंडात निर्माण झालेले साहित्य यांचा काही एक संबंध हा असतोच कारण समाजात जी परिवर्तने घडतात त्याचा परिणाम त्या काळात निर्माण होणाऱ्या साहित्यावर होत असतो. साहित्याला समाजाचा आरसा म्हणतात ते याच अर्थाने! ज्या वेळी ही परिवर्तने ठळकपणे दिसू लागतात, तेव्हा कालानुरूप हे वेगळे कालखंड मानण्याची प्रथा आहे. हे बदल वाङ्मयाच्या प्रकारानुसार भिन्न भिन्न असे असतात तर काही वेळा ते समांतर असे ही असतात. मराठी कादंबरीच्या संदर्भात विचार करता 1857 ते 1880, 1880 ते 1920, 1920 ते 1960 1960 ते 1990 व 1990 नंतर असे कालखंड मानण्याची प्रथा आहे. हे कालखंड मराठी कथा किंवा कविता या वाङ्मय प्रकारांचा विचार करता काहीसे भिन्न आहेत. कालखंड ही मानवनिर्मित संकल्पना असल्याने हे मानण्याबद्दल अनेक मतभेद असल्याचे ही दृष्टीस पडते. समाजात घडणाऱ्या सर्वच घटनांचा परिणाम वाङ्मय निर्मितीवर होतोच असे नाही, त्यामुळे कालखंड करताना तारतम्याने विचार करावा

लागतो. परिवर्तने स्पष्टपणे दिसू लागतात तेव्हाच नवीन कालखंड मानावा लागतो किंवा अशावेळीच नवीन कालखंड मानणे सयुक्तिक असते. नव्वदोत्तर काळात कादंबरी वाङ्मयाचा विचार करता असा कालखंड स्पष्टपणे दिसत असल्याने नव्वदोत्तर हा कालखंड मानणे सयुक्तिक ठरते. ग्रामीण कादंबरीचा प्रारंभीचा प्रवाह हा अत्यंत क्षीण असल्याचे दिसते. 1960 नंतरच्या काळात हा प्रवाह जोमाने पुढे आला. साठोत्तरी काळ हा ग्रामीण कादंबरीच्या स्वरूप निश्चितीचा आणि विस्ताराचा कालखंड होता असे ही म्हणता येते. स्वातंत्र्योत्तर काळात कृषिक्षेत्रात तसेच एकूण ग्रामीण क्षेत्रात अनेक बदल झाले. रस्ता, वीज, पाणी, अशा आत्यंतिक महत्त्वाचा परंतु ग्रामीण समाज ज्यापासून आजपर्यंत वंचित होता त्या गोष्टी गावापर्यंत पोहचल्याने गावाचे जीवनमान पूर्ण बदलून गेले. खेडे व गाव यातील अंतरही कमी झाले. ग्रामीण माणसांचा शहराशी असलेला संपर्क मोठ्याप्रमाणात वाढला. कृषी क्षेत्राचेही आधुनिकीकारण झाले. नवीन यंत्रे, खते, किटकनाशके, शेतीची विविध औजारे उपलब्ध झाली. ट्रेक्टर, ट्रीलर यांच्या आगमनाने अजारो वर्षे चालू असलेली बैलांच्या मदतीने केली जाणारी शेती मागे पडली. या ठिकाणी नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ऐंशीच्या दशकात ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यामधून हे सर्व बदलत आहे, नष्ट होत होत आहे या बद्दलचे भाबडे दुःख व्यक्त होताना दिसते. नव्वदोत्तर कादंबरीत मात्र याचा अपरिहार्य पणे का असेना शेतकरी स्वीकार करीत असताना दिसतो. जागतिकीकरणाच्या आगमनानंतर जागतिक स्तरावर जे बदल झाले आणि भांडवली अर्तव्यवस्थेचा फास जसजसा आवळला जाऊ लागला तसतसा येथील शेतकऱ्यांची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची होऊ लागली. हजारो वर्षाच्या आपल्या कृषिकेंद्रीत व्यवस्थेत शेतकरी हा सर्वांचा पोशिंदा होता परंतु जागतिकीकरणाच्या आगमनानंतर तो मुळासकट उखडून टाकला गेल्याचे दिसते व एकाच वेळी त्याला अनेक पातळ्यांवर आपल्या अस्तित्वाची लढाई लढावी लागते असेही दिसते. या व्यवस्थेच्या विरोधात लढण्यासाठीचे त्याचे बळ कमी पडत असल्याने तो आत्महत्येच्या दारात पोहचत आहे. आज शेती हा शेतकऱ्यांसाठी फास झाला असून हा सगळा व्यवसायच आतबट्ट्याचा झाला आहे, याची तीव्र जाणीव आपणाला नव्वदोत्तर कादंबरी देताना दिसते. कालखंडांच्या संदर्भात वाङ्मयाचा अभ्यास केल्यास कोणत्या टप्प्यावर वाङ्मयात परिवर्तने ठळकपणे जाणवतात हे समजते त्यामुळे कोणत्या टप्प्यावर नवा कालखंड मानावा याची काही एक कल्पना आपणाला येते. कालखंडाच्या अभ्यासातून समाज परिवर्तने व साहित्य यातील सहसंबंधाचा सूक्ष्म अभ्यास करून काही एक निष्कर्ष काढणे सहज नक्य होते. नव्वदोत्तर काळात वाङ्मयातील परिवर्तने अगदी ठळक झाल्याने नव्वदोत्तर हा कालखंड मानणे सयुक्तिक ठरते व अभ्यासाच्या दृष्टीने ते योग्य असल्याचेही आपणाला दिसून येते.

एखाद्या कालखंडातील एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या स्वरूपाचे अध्ययन करायचे असल्यास त्या काळातील काही निवडक कादंबऱ्यांची प्रातिनिधिक स्वरूपात निवड करून निष्कर्ष मांडणे वा त्या आधारे त्या कालखंडातील त्या प्रकाराच्या एकूण वाङ्मयाची चिकित्सा करणे संयुक्तिक ठरते. विशिष्ट कालखंडात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक साहित्यकृतीचे अध्ययन करणे शक्य नसते म्हणूनच नव्वदोत्तर ग्रामीण कदंबऱ्यांचा अभ्यास काही निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात करून, जे निष्कर्ष हाती आले ते एकूण नव्वदोत्तर कादंबरीच्या स्वरूपासंबंधीचे निष्कर्ष म्हणून मांडले आहेत. हा अभ्यास प्रातिनिधिक स्वरूपाचा असल्याने अशाप्रकारे निष्कर्ष मांडणे योग्यच ठरते. हा अभ्यास आशय आणि आविष्कार अशा दोन्ही पातळ्यावर केला आहे. हा अभ्यास करताना काही प्रमाणके निश्चित करून त्या आधारे हा अभ्यास केला आहे. कोणत्याही कादंबरीचा आशय हा अत्यंत महत्त्वाचा असतो. त्या कादंबरीच्या आशयावरूनच त्या काळातील त्या प्रकारच्या एकूण कादंबरीचे स्वरूप निश्चित होत असते. या निवडक कादंबऱ्यांचा आशयदृष्ट्या अभ्यास करताना, या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनचित्रण, कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कालभान व या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन या तीन प्रमुख मुद्द्यांच्या आधारे ही चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात हा अभ्यास अधिक नेमका व सखोल व्हावा म्हणून या मुख्या मुद्द्यांचा अभ्यास त्याची आणखी काही छोट्या छोट्या मुद्द्यांमध्ये विभागणी करून केला आहे व त्यामुळे त्यातून आलेले निष्कर्ष हे एकूण नव्वदोत्तर कादंबरीचे निष्कर्ष म्हणून सांगितले आहेत.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील जीवनचित्रणाचा विचार करता, या सर्व कादंबऱ्या कृषिकेंद्रीत आहेत हे निश्चित पणे सांगता येते. कृषिकेंद्रीतता हे जे ग्रामीण कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सांगितले जाते ते नव्वदोत्तर कादंबऱ्यांनाही लागू पडते. नव्वदोत्तर काळात बदललेल्या आणि शेतकऱ्यांचे जगणे अशक्य करू पहात असलेल्या परिस्थितीचे वर्णन या कादंबऱ्यांतून होताना दिसते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील अनेक कादंबऱ्या या समस्याप्रधान आहेत. या कादंबऱ्यातील समस्यांचे स्वरूप भिन्न भिन्न असले तरी त्या सर्व समस्या कृषिशी संबंधित आहेत हे लक्षात येते. अवकाळी पाऊस असेल, सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार असेल, व्यापाऱ्यांकडून होणारी लूट आणि फसवणूक असेल किंवा शेती उत्पादनाला भाव न मिळणे ही असेल. अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या शेतकऱ्यांचे चित्रण या कादंबऱ्यांतून होताना दिसते. आज शेती करणे जवळ जवळ अशक्य झाले आहे. शेतीतील माणूस कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडणे अशक्य आहे. एक तर जमिनी विकून टाकणे व शहरात जाऊन मोलमजुरी करणे किंवा आत्महत्या करणे असे दोनच पर्याय आज शेतकऱ्यांसमोर उपलब्ध आहेत. एवढ्या भयाण आणि निराशाजनक स्थितीचे वर्णन या कादंबऱ्या करताना दिसतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने

शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडून टाकले आहे. वरवर पाहता या प्रक्रियेने गावचा विकास केला असेच वाटते परंतु सूक्ष्मपणे अभ्यास करतो त्या वेळी या जागतिकीकरणांने शेतकऱ्यांना कसे उद्ध्वस्त केले हे लक्षात येते. या संदर्भात 'चाळेगत' सारख्या कादंबरीतून येणारे अनेक संदर्भ अभ्यासण्यासारखे आहेत. आज शेतीतून चांगले उत्पादन आले तरी देखील शेतकरी सुखी होत नाही कारण उत्पादन चांगले येते तेव्हा मालाचा दर पडतो त्यामुळे शेतकरी कर्जाच्या फेऱ्यात आणखी अडकतो. गोव्या सारख्या छोट्या राज्यात शेतकऱ्यांना आधारभूत किमती सारख्या काही योजनांचा लाभ दिला जातो परंतु मोठ्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी अशा योजना हे अजून तरी स्वप्नंच आहेत. आंदोलने करून देखील शेतकऱ्यांच्या समस्या आज सुटत नाहीत, उलट आंदोलन करणाऱ्यांच्या आयुष्याची ससेहोलपट होते हे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून व्यक्त होणारे वास्तव अधिक अस्वस्थ करणारे आणि भयानक असे आहे. आज शेती शेतकऱ्याला जगवू शकत नाही त्याला जगायचे असेल तर दुसरा उद्योगधंदा करावा लागेल हे व्यक्त होणारे वास्तव आजच्य एकूण शेतीची झालेली भयाण अवस्था चित्रित करते. कोणतीच कादंबरी शेतीचे गौरविकारण करताना दिसत नाही. अभ्यासासाठी निवडलेली कोणतीही कादंबरी फक्त शेतकऱ्याचे दुःखच मांडताना दिसते. या सर्वाची कारणमीमांसा देखील या कादंबऱ्या करताना दिसतात. वस्तुविनियमन पद्धतीवर आधारित अर्थव्यवस्था लोप पावणे व बाजारकेंद्रीत अर्थव्यवस्था उदयाला येणे, नियोजनशून्य पद्धतीने घेतली जाणारी नगदी पिके, शेतीच्या झालेल्या वाटण्या, ढासळलेली एकत्रित कुटुंब व्यवस्था, रासायनिक कीटकनाशके व खते यांचा वाढता वापर, प्रचंड प्रमाणात वाढलेला उत्पादन खर्च, अनियंत्रित पद्धतीने झालेले आधुनिकिकारण, शेतीतील एवढ्या वर्षांची निसर्ग आणि मानव यांच्या सहचर्याची तुटलेली साखळी, सरकारी क्षेत्रातील व सहकार क्षेत्रात मोठ्याप्रमाणात बोकाळलेला भ्रष्टाचार, अशी अनेक कारणे या कादंबऱ्यांनी अधोरेखित केली आहेत. नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या दुःखाची जातकुळी नव्वदपूर्व कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या कादंबरीतील दुःखाशी नाते सांगणारी असली तरी आता जगणेच अशक्य झाले आहे हे अधोरेखित करणारी आहे. ग्रामसंस्कृतीत समुह भावनेला किंवा या सामुहिकतेला खूप महत्त्व असते परंतु नव्वदोत्तर काळात या सामुहिकतेलाच तडा गेल्याचे आपल्या लक्षात येते. ग्रामीण जनमानस झपाट्याने बदलत असले तरी लोकसंस्कृतीचा प्रभाव ग्रामीण जनमानसावर अजूनही असल्याचे अनेक दाखले या कादंबऱ्यांतून आले आहेत. अनेक लोकविधी, लोकसमज, चालीरीती, यामधून या कादंबऱ्यांतील ग्रामीणत्त्व नेमकेपणाने अधोरेखित होताना दिसते. गावागावात सर्व गोष्टींमध्ये घुसलेले राजकारण ग्रामीण माणसाला उद्ध्वस्त करण्याचे सर्वात मोठे कारण ठरत आहे हे या कादंबऱ्यांनी व्यक्त केलेले वास्तव सर्वात चिंताजनक म्हणावे असे आहे. आज कोणालाच शेती करावी असे वाटत नाही तर शेतीतून बाहेर

कसे पडता येईल याचा विचार तो करताना दिसतो. कोणत्याच शेतकऱ्याला आपला मुलगा शेतकरी व्हावा असे वाटत नाही. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघर्ष केल्यास शेतकऱ्यांना त्यांचा न्याय्य हक्क मिळू शकेल असा आशावाद काही कादंबऱ्या व्यक्त करतात परंतु अनेक कादंबऱ्या शेतकऱ्यांचा संघर्ष हा देखील वांझोटाच ठरतो हेच मांडताना दिसतात. ग्रामीण स्त्रीचा संघर्ष तर अधिक खडतर झाला आहे याचे चित्रण नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून होताना दिसते. ‘गावठाण’ सायख्या कादंबरीतून व्यक्त झालेला संघर्ष यादृष्टीने पाहण्यासारखा आहे. येणारा काळ हा अजून जास्त संघर्षाचा असून, शेती करून शेतकऱ्यांचा टिकाव लागणे अशक्यच आहे हेच या कादंबऱ्या पुन्हा पुन्हा अधोरेखित करताना दिसतात.

बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांच्या आयुष्यात नवनवीन समस्यांची भर पडताना दिसते. आज शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले परंतु त्यांचे शिक्षण त्यांना नोकरी देण्यास असमर्थ आहे आणि शिक्षण त्यांना शेतीबद्दल उदास बनविते त्यामुळे बेकारीची समस्या आज मोठ्याप्रमाणात वाढली आहे. बेकारी शेतकऱ्यांच्या मुलांना अनैतिक धंद्यांकडे घेऊन जाताना दिसते. शेतकऱ्यांच्या मुलांना आज मुली मिळणे कठीण झाले आहे कारण शेतकऱ्यांच्या मुलाला आपली मुलगी देण्यास कोणताही बाप तयार होत नाही. आधुनिक शेतीने ग्रामीण भागातील करागिरांना देशोधडीला लावले आहे हे आणखी एक भयाण असे वास्तव या कादंबऱ्यांमधून चित्रित झाले आहे. कालानुरूप आपल्या पीक पद्धतीत बदल केल्यास त्याचा शेतकऱ्यांना काहिसा फायदा होईल असा आशावाद काही कादंबऱ्या व्यक्त करताना दिसतात परंतु हा स्वर अत्यंत क्षीण असल्याचे दिसते. आजच्या शेतकऱ्यांच्या या स्थितीला स्वतः शेतकरी, भांडवलशाही अर्थव्यवस्था या अर्थव्यवस्थेचे पाईक असलेले सरकार, व्यापारी, स्वतःला तज्ज्ञ म्हणून घेणारे कृषी तज्ज्ञ कारणीभूत आहेत, हा निष्कर्ष या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून पुढे येताना दिसतो व हेच वास्तव एकूण सर्वच नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसते.

कादंबरी लिहीत असताना त्यामागे लेखकाची काही एक भूमिका असते, दृष्टिकोन असतो, त्याला काही सांगायचे असते व त्या अनुषंगाने तो लिहीत असतो. म्हणजेच कादंबरीच्या निर्मितीमागे लेखकाची चिंतनशीलता असते. ही चिंतनशीलता कधी निवेदनातून, कधी पात्रांच्या मुखातून कधी घटना प्रसंगांच्या वर्णनातून देखील व्यक्त होत असते. चिंतनशीलतेतूनच लेखकाची नैतिक दृष्टी देखील व्यक्त होत असते. अर्थात नैतिकता म्हणजे सामाजाची नैतिक भूमिका नव्हे तर लेखकाची लेखक म्हणून आपल्या लेखनामागे असलेली नैतिक भूमिका. अनेकवेळा लेखकाच्या नैतिक भूमिकेचा समाजाच्या नैतिक भूमिकेशी संघर्ष होताना दिसतो. या संघर्षातूनच परिवर्तनाच्या पाऊलखुणा निर्माण होतात असेही दिसून येते. ज्या कादंबऱ्यांना अशी चिंतनशीलता लाभलेली असते, स्वतःचे असे तत्त्वज्ञान

लाभलेले असते त्या कादंबऱ्या कालाच्या पटलावर अक्षर होऊन वावरताना दिसतात. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या चिंतनशीलतेचे स्वरूप वेगवेगळे आहे. आज परिस्थिती अत्यंत झपाट्याने बदलत आहे. कधीकाळी कोणी विचारही केला नव्हता अशी परिवर्तने गेल्या काही वर्षात आपण अनुभवली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर आजच्या बदलत्या परिस्थितीचे लेखकांनी केलेले आकलन त्याच्या चिंतनशीलतेतून व्यक्त होताना दिसते. या चिंतनशीलतेचा विस्तृत आढावा तिसऱ्या प्रकरणांत विस्ताराने घेतला आहे. एकूण या सर्व चिंतनशीलतेचा काही एक सारांश सांगायचा म्हटल्यास, नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरीचे लेखन ग्रामीण माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्या माणसाच्या आणि त्याच्या खडतर होत असणाऱ्या जगण्याच्या कळवळ्यापोटी झाले असले, तरी एकूण नव्वदोत्तर कादंबरी म्हणून विचार करता नेमकी अशी एखादी वैचारिक भूमिका घेऊन नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचे लेखन झाले आहे असे दिसत नाही. काही मोजक्याच लेखकांनी नेमकी भूमिका घेऊन लेखन केल्याचे दिसते. परंतु एकूण सर्वच लेखनामांगे सामान्य माणसाच्या उत्थानाचा एक विचार आहे असे मात्र निश्चितपणे म्हणता येते. आजचे समाजवास्तव ही कादंबरी मांडते त्याच बरोबर या परिस्थितीची कारणमीमांसा देखील करते परंतु या सर्वातून वाट कशी काढायची? याचे दिग्दर्शन मात्र ही कादंबरी करीत नाही. अर्थात, हे म्हणत असताना, ‘तणकट’, ‘एसे कुणबी भूपाळ’, ‘चळेगत’ अशा काही कदंबऱ्यांचा अपवाद करवा लागतो, म्हणजे अजून मराठी ग्रामीण कादंबरीला द्रष्टेपण आलेले नाही असा निष्कर्ष काढता येत असला तरी ज्या सातत्यपूर्णतेने नव्वदोत्तर काळात ग्रामीण कादंबरीचे लेखन होत आहे ते लक्षात घेतल्यास, येत्या काळात ही कादंबरी पुढच्या टप्प्यालर जाईल आणि हा पुढचा टप्पा हा द्रष्टेपणाचा असेल असे आपण म्हणू शकतो, किमान हा विश्वास अभ्यासासाठी ज्या कदंबऱ्या निवडल्या होत्या त्या कादंबऱ्यांनी निर्माण केला आहे.

कोणत्याही कादंबरीची आशय आणि अभिव्यक्ती ही दोन महत्त्वाची अंगे असतात. ग्रामीण कादंबरी देखील याला अपवाद नाही. कादंबरीचा आशय महत्त्वाचा असला तरी वाचकाला आशयाच्या मुळापर्यंत घेऊन जाण्याचे काम कादंबरीची अभिव्यक्तीच करते. अर्थात शब्द हे वाङ्मयाचे महत्त्वाचे अंग असते आणि साहित्याची अभिव्यक्ती ही शब्दाच्या माध्यमातूनच होत असते त्यामुळे साहित्याचा अभ्यास करताना त्याच्या भाषिक अंगाचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो. एकूणच ग्रामीण कादंबरीचा विचार करता, ग्रामीण कादंबरीची म्हणून काही एक शैली विकसित झाल्याचे आपणाला दिसते. ग्रामीण कादंबरी लेखनाचा विचार करता, बोलीभाषेचा लेखनात झालेला वापर हे ग्रामीण कादंबरी लेखनाच्या शैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. त्यामुळेच ग्रामीण शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा वापर या लेखनातून झालेला दिसतो. त्याच बरोबर, विविध प्रदेशांतील बोलींचा वापर ग्रामीण कादंबरीत होत

असल्याने या शैलीला एक वेगळेपण प्राप्त होताना दिसते. ग्रामीण परिसर, तेथील कृषिकेंद्रीत जीवन, त्या ठिकाणची निसर्गसन्मुखता, लोकपरंपरा या सर्वांच्या संस्कारातून ग्रामीण कादंबरीची लेखनशैली घडल्याचे दिसते. त्यामुळे त्या ठिकाणचे पात्रे, घटना, प्रसंग, यांच्या वर्णनात वेगळेपणा असल्याचे दिसते. म्हणजेच पारंपरिक कादंबरी लेखनाची शैली आणि ग्रामीण कादंबरी लेखनाची शैली यात काही एक फरक असल्याचे दिसते. ग्रामीण कादंबरीची शैली ही अधिक वास्तववादी चित्रण करणारी अशी आहे. ग्रामीण माणसाच्या जगण्याशी एकरूप होऊन ती आकाराला आलेली दिसते.

साहित्याच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य हे अभिव्यक्तीचे चार महत्त्वाचे घटक असल्याचे दिसते. किंबहुना ही साहित्याच्या अभिव्यक्तीची चार अंगे असेही म्हणता येते. कादंबरीतील प्रवाहीपणा टिकवून ठेवण्याचे, तिची वाचनियता कायम ठेवण्याचे काम कादंबरीतील निवेदन करताना दिसते. अभ्यासासाठी ज्या नव्वदोत्तर कादंबऱ्या निवडल्या होत्या त्यातील काही मोजक्या कादंबऱ्यांचा अपवाद वगळल्यास या कादंबऱ्यांनी निवेदनाच्या पातळीवर काही विशेष प्रयोग केले आहेत असे दिसून येत नाही. बऱ्याच कादंबरी लेखकांनी तृतीयपुरूषी निवेदनपद्धतीचा वापर केला असून काही कादंबऱ्यांतून प्रथमपुरूषी निवेदन आले आहे. आशयानुसार निवेदनाच्या पद्धतीत बदल झाले आहेत असेही आपणाला दिसून येते. ‘चाळेगत’ या प्रवीण बांदेकर यांच्या कादंबरीत निवेदनाच्या पातळीवर अनेक प्रयोग केल्याचे लक्षात येते. या कादंबरीचा आवाका खूप मोठा असल्याने व आजच्या भीषण वर्तमानाला वेगवेगळया अंगांनी भिडण्याचा प्रयत्न लेखक या कादंबरीतून करीत असल्याने, एकच एक निवेदनपद्धती स्वीकारल्यास लेखकाच्या लेखनावर जी बंधने येतात ती झुगारून आशयाच्या समग्रतेशी पूर्णपणे भिडण्याच्या अभिनिवेशातून निवेदनातील हे प्रयोग लेखकाने केल्याचे दिसतात. काहीवेळा हे भाषिक प्रयोग सामान्य वाचकाला कादंबरी वाचनापासून दूर नेतात हे ही या ठिकाणी नमूद केले पाहिजे. मनातील दुःखाचे कढ व्यक्त करण्यासाठी काहीकडे ‘महानुभाव लेखन शैलीचा केलेला वापर’ हे सदानंद देशमुख यांच्या ‘बारोमास’ या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. निवेदनाच्या पद्धतीत देखील एक लवचीकता असल्याचे दिसते. महत्त्वाचे म्हणजे, हे निवेदनातील प्रयोग कादंबरीला अधिक वाचनीय बनवणारे ठरले आहेत. कथानकाला आकार हा त्यातील पात्रांमुळे प्राप्त होतो, पात्रे नसतील तर कादंबरीतील कथानक आकारच घेऊ शकणार नाही त्यामुळे कादंबरीतील भाषिक अभिव्यक्तीचा विचार करीत असताना पात्रे किंवा व्यक्तिरेखा हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो हे अपल्या लक्षात येते. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता, ग्रामीण जगण्याचे सर्व विशेष घेऊन ही पात्रे कादंबरीत जीवंत झालेली दिसतात. त्याचप्रमाणे कथानकाची आवश्यकता लक्षात घेऊन पात्रांची

निर्मिती होते असेही आपला दिसून येते. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता, बहुतेक कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी पुरूषपात्रे असल्याचे दिसते. अभ्यासासाठी निवडलेल्या एकोणीस कादंबऱ्यांपैकी फक्त दोनच कादंबऱ्या स्त्रीप्रधान आहेत असे म्हणता येईल. या कादंबरीतून येणारी बहुतेक पात्रे ही विविध समस्यांनी ग्रासलेली असून त्यांचा जगण्यासाठीचा संघर्ष सातत्यांने चालू असल्याचे दिसते. अनेकवेळा या व्यक्तिरेखा निकाराचा संघर्ष करतात परंतु या बदललेल्या व्यवस्थेसमोर त्या टिकू शकत नाहीत व शेवटी मोडून पडतात. शेवटी त्यांच्या आयुष्याची शोकांतिका होते. स्त्री पात्रांचा विचार करता आत्यंतिक सोशिक अशी वृत्ती, ही नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. दुःखाचा भार सोसण्यासाठीच त्यांचा जन्म आहे असे वाटावे एवढी दुःखे त्यांच्या वाटेला येताना दिसतात. ग्रामीण परिसरात आजही स्त्रियांची शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या शोषण होते. दुय्यम स्वरूपाचे जीवन त्यांच्या वाटेला येते. हुंड्यासारख्या प्रथा आजही स्त्रीसाठी शाप होऊन ग्रामीण भागातून वावरताना दिसतात. आपण कायदे करतो परंतु ते फक्त पुस्तकात राहतात ते सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत आणि त्याचे अन्यायग्रस्त जीवन तसेच राहते याचा अनुभव या कादंबऱ्यांतून वारंवार येतो. फक्त स्त्रीपात्रांच्या बाबतीतच नव्हे तर इतर सामाजिक संदर्भातही तो वारंवार येतो. ग्रामीण अवकाश हा ग्रामीण कादंबरीला संमृद्ध करणारा महत्त्वाचा घटक आहे. एका विस्तृत ग्रामीण अवकाशात अनेक छोटे छोटे अवकाश या कादंबऱ्यांतून येताना दिसतात. या छोट्या छोट्या अवकाशातून हा ग्रामीणतेचा मोठा अवकाश आपल्यासमोर साकार होतो. वेळ, काळ परिस्थिती या सर्वाच्या परिणामांतून कादंबरीतील अवकाश निर्माण होतो. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता, नव्वदपूर्व कादंबऱ्यां पेक्षा या कादंबऱ्यांतील अवकाश अधिक विस्तृत झाल्याचे दिसते. नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, कारागीर, स्त्रीया, विविध जाती जमातीतील माणसे या सगळयांचे विश्व साकारताना दिसते. त्यामुळे आजच्या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून एक विस्तृत अवकाश साकार होताना दिसतो.

कादंबरीच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना कादंबरीतील संवादांचा विचार निश्चितच करावा लागतो. पात्रांचे स्वभावधर्म संवादातून जास्त चांगल्याप्रकारे समजतात. पात्रांच्या मनाचे दर्शन अनेकदा पात्रांच्या संवादातून घडत असते. कथानकाला गती देण्याचे, कथानकातील ताण तोलून धरण्याचे काम कादंबरीतल संवाद करताना दिसतात. विचार प्रतिपादनाचे महत्त्वाचे कार्य हे देखील कादंबरीत मुख्यतः संवादाच्या माध्यमातूनच साधले जाते. त्यामुळे कादंबरीच्या रचनेत संवाद हे महत्त्वाचे असतात. पात्रांची मानसिक स्थिती, त्यांच्या जीवनाबद्दलच्या धारणा, त्यांचे जीवनविषयक चिंतन हे सर्व समजून घेण्यासाठी त्यांचे इतरांबरोबर व काहीवेळा स्वतःसोबत देखील होणारे

संवाद खूप महत्त्वाचे असतात.  लेखकाचे भाष्य म्हणजेच कादंबरीतून लेखकाचे जीवनविषयक व्यक्त झालेले चिंतन असते. याचा ऊहापोह अगोदरच झालेला आहे तरी थोडक्यात सांगायचे तर, वर्तमान परिस्थिती, माणसाला भेडसावणारे प्रश्न, एकूणच त्याच्या जगण्यासंबंधी निर्माण झालेले प्रश्न, बदलते वास्तव आणि त्यातून निर्माण झालेले किंवा होऊ शकणारे प्रश्न या सर्वाबद्दलचे लेखकाचे विचार म्हणजेच लेखकाचे भाष्य. हे भाष्य करण्यासाठी लेखकाने वेगवेगळ्या शैलीचा वापर केलेला असतो. अनेकवेळा प्रसंगानुरूप तर कधी सूचकपणे, कधी पात्रांच्या वर्तनातून तर कधी निवेदनातून, लेखक हे भाष्य करीत असतो. लेखकानुसार या भाष्याची शैली बदलते असेही म्हणता येते. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ सारख्या कादंबरीत अगदी हरिभाऊंच्या पद्धतीने निवेदनातूनच लेखक आपले भाष्य करताना दिसतो तर ‘तणकट’, ‘बारोमास’, ‘चाळेगत’ अशा काही कादंबऱ्यांतून वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवून हे जीवनविषयक भाष्य केले आहे असे दिसून येते. ‘चाळेगत’ मधील संकासुराची प्रतिकात्मकता, ‘बारोमास’ मधील महानुभाव शैलीचा डायरी सदृश केलेला वापर किंवा ‘तणकट’ मध्ये संवादाचे माध्यम वापरून हे भाष्य करण्यात आले आहे. एकूणच ग्रामीण कादंबरीच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना, नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून अभिव्यक्ती संदर्भात काही मोजक्या लेखकांचा अपवाद वगळता प्रयोगशीलता दिसून येत नाही. कादंबरीतील आशय नेमकेपणांने वाचकांपर्यंत पोचेल अशा प्रकारची भाषिक अभिव्यक्ती साधण्यात मात्र या कादंबऱ्या यशस्वी ठरल्या आहेत असे निश्चित म्हणता येते.

एकूणच ‘नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी एक चिकित्सक अभ्यास: निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात या विषयावर प्रबंध लेखन करीत असताना, जे काही निष्कर्ष हाती आले त्याची सांगोपांग मांडणी त्या त्या प्रकरणांमध्ये त्या त्या प्रकरणाच्या अनुषंगाने केली आहे. समारोपात सूत्र रुपाने निष्कर्षांची मांडणी करताना, अस्पर्शित राहिलेल्या या संदर्भातील काही मुद्द्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासातून नव्वदोत्तर मराठी कादंबरीच्या अभ्यासाला एक नवीन परिमाण मिळेल असा विश्वास वाटतो.

# संदर्भग्रंथ सूची


1) कऱ्हाडे, सदा, 'कादंबरी आणि कथा: एक अनुबंध', (संपा) जाधव, मा. मा.

'अक्षरगाथा (कादंबरी विशेषांक), वर्ष दुसरे, अंक पहिला, दुसरा, (जोड अंक), नांदेड जुलै-2011.

2) थोरात, हरिश्चंद्र, 'कादंबरी एक साहित्य प्रकार, शब्द पब्लिकेशन्स्, मुंबई,2010,

3) देशपांडे, कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, 1954

4) भागवत, श्री. पु., व इतर (संपा.), 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई, 2011

5) गणोरकर, प्रभा, व इतर (संपा), ' वाङ्मयीन संज्ञा- संकल्पना कोश', जी. आर. भटकळ फाउण्डेशन,

मुंबई, 2001

6) बापट, प्र., वा., गोडबोले, ना., वा., 'मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन,

पुणे, 1973,

7) कुलकर्णी, श्री., मा., 'कादंबरी रचना' उन्मेष प्रकाशन, नागपूर, 1956

8) देशपांडे, मा., का., 'साहित्यसाधना' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1961

9) देशपांडे, कुसुमावती, ' मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ दु.आ.1975

10) जोशी, लक्ष्मणशास्त्री, (संपा.) 'मराठी विश्वकोश', खंड-3, म.रा.सा.सं.मं., मुंबई, 1976

11) नेमाडे, भालचंद्र, 'टीकास्वयंवर' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2001

12) नंदपूरे, ईश्वर, (संपा) 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, नागपूर 2002

13) यादव, आनंद, 'ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1981

14) भोसले, द., ता.,'ग्रामीण साहित्य एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2009

15) मुलाटे, वासुदेव, 'ग्रामीण साहित्यःस्वरूप व दिशा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2011

15) टेकले, संग्राम, (संपा.) 'मराठी ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा' शौर्य पब्लिकेशन, लातूर, 2017

16) जाधव, गजानन, (संपा), ‘नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी.’ अनघादित्य प्रकाशन, अमरावती, 2021

17) थोरात, हरिश्चंद्र ' कादंबरीविषयी-', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८

18) जाधव, मनोहर, देशमुख, श्रीकांत, (संपा.) नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ, 'समकालीन साहित्यचर्चा 'प्रतिमा प्रकाशन, 2010,

19) यादव, आनंद, ‘ग्रामीण साहित्य समाज आणि संस्कृती’मेहता पब्सिशिंग हाऊस, पुणे, 1985

20) खरात, महेश, 'ग्रामीण साहित्य: आस्वाद आणि आकलन', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 2008

21) देशमुख, उषा, (संपा) ' वाङ्मयाच्या कालखंडांचा अभ्यास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,1994

22) कुलकर्णी, गो., म., पुंडे, दत्तात्रय, (संपा) 'वाङ्मयेतिहास: सद्यःस्थिती आणि अपेक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,1995, पृ.176

23) 'पाचोळा आणि दहा समीक्षक', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, 1989

24) चंद्रकुमार, नलगे, (संपा.) ' ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013

25) जाधव, रा.ग. व इतर, (संपा.) ' मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, 2010

26) कुलकर्णी अनिरुद्ध, (संपा.), प्रदक्षिणा खंड-2, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2008.

27) कोत्तापल्ले, नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,2007

28) ठाकूर, रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1993

29) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018

30) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015

31) विंगकर, आनंद, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016

32) परुळेकर, अनिल, '‘वाहतं पाणी’ ' गोमंतक मराठी अकादमी, पणजी, 2009

33) गावस, चंद्रकांत, ‘इदवास’ गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018

34) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009,

35) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018

36) दौंड, कैलास, ‘कापूसकाळ’ मॅजेस्टिक प्रकाशन, ठाणे, 2015

37) कदम, वैजनाथ, 'बदलती ग्रामसंस्कृती', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, 2012

38) इंगोले, प्रतिमा, 'बोडखी', सोनल प्रकाशन, अमरावती, 2009

39) बांदेकर, प्रवीण, 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009

40) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन, मुंबई, 2008

41) गवस, राजन, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017

42) पाटील, मोहन, 'साखरफेरा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006

43) खोत, कृष्णात 'गावठाण', शब्दालय प्रकाशनह, श्रीरामपूर, 2009

44) पाटील, सुरेंद्र, 'चिखलवाटा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007

45) ठाकूर, रवींद्र, 'कादंबरीकार र. वा. दिघे', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2012

46) सावंत, मथु, ', 'जिनगानी'', सुमेय प्रकाशन, नांदेड, 2000

47) परुळेकर, अनिल, 'वनराईचा लढा', गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2006

48) काजरेकर, गोविंद, 'राजन गवस याचे कथात्म साहित्यः एक अभ्यास' गोवा विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध, 2008,

49) यादव, आनंद, 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1989

50) पाटणकर, रा. भा., 'सौंदर्यमीमांसा', मौज प्रकाशनगृह, मुंबई, 2001

51) थोरात, हरिश्चंद्र, 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन, मुंबई, 2011

52) सोलापुरे, रसुल, 'फाटलेलं आभाळ', अभिनंदन प्रकाशन, गडहिंग्लज, 2019

53) कुलकर्णी, मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र व स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1984

54) एन्, शिवदास, 'भगदाड', उर्बा प्रकाशन, फोंडा-गोवा, 2006

इंग्रजी संदर्भ ग्रंथांची सूची

55) Maurice Sheoder ' The Novel as a Ghetana essay included in the ' Theory of Novels' ed. by Philip Stevie. The free press, New York 1967

**आधारग्रंथ सूची**

1) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018

2) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015

3) विंगकर, आनंद, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016

4) परुळेकर, अनिल, '‘वाहतं पाणी’ ' गोमंतक मराठी अकादमी, पणजी, 2009

5) गावस, चंद्रकांत, ‘इदवास’ गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018

6) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009,

7) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018

8) दौंड, कैलास, ‘कापूसकाळ’ मॅजेस्टिक प्रकाशन, ठाणे, 2

9) इंगोले, प्रतिमा, ‘बोडखी’, सोनल प्रकाशन, अमरावती, 2009

10) बांदेकर, प्रवीण, ‘चाळेगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009

11) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन, मुंबई, 2008

12) गवस, राजन, ‘तणकट’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017

13) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006

14) खोत, कृष्णात ‘गावठाण’, शब्दालय प्रकाशनह, श्रीरामपूर, 2009

15) पाटील, सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007

16) सावंत, मथु, ', ‘जिनगानी’', सुमेय प्रकाशन, नांदेड, 2000

17) परुळेकर, अनिल, ‘वनराईचा लढा’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2006

18) सोलापुरे, रसुल, ‘फाटलेलं आभाळ’, अभिनंदन प्रकाशन, गडहिंग्लज, 2019

19) एन्, शिवदास, ‘भगदाड’, उर्बा प्रकाशन, फोंडा-गोवा, 2006


-------------------------------- समाप्त ------------------------------------